नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १४५ * | * अकोला * | शुक्रवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## मला २ तारखेपर्यंत युती टिकवायची..

### रवींद्र चव्हाण यांचे मोठे विधान

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २७ :
शिंदेसेनेसोबतच्या वादावर भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी एक स्फोटक विधान केले आहे. मला २ तारखेपर्यंत युती टिकवायची आहे, त्यामुळे मी आता काहीच बोलणार नाही, असे वक्तव्य केल्याने खळबळ उडाली आहे.

शिंदे गटातील पदाधिकारी आणि नेत्यांना भाजपमध्ये प्रवेश दिल्याच्या कारणावरून शिंदे यांनी अमित शाह यांच्याकडे तक्रार केल्याचे समजते. त्यावरून भाजपा नेते नाराज असून, आज चव्हाण यांनी मला २ तारखेपर्यंत युती टिकवायची आहे, असे विधान केले. यावरून महायुतीत मोठा भूकंप होणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# हृदयहीन जोकर

देशात नको ते करणारे, नको त्या गोष्टी नको त्या भाषेमध्ये बोलणारे अनेक जण आहेत. त्यासोबतच अतिरेकी चोंबडेपणा करून व्यंग असलेल्या दिव्यांगाना हिणवणारे अनेक प्राणी आहेत. हे सगळे दोन पायाचे प्राणी बडवण्याच्याच लायकीचे आहेत. यामध्ये हल्ली समय रैना नावाच्या एका अयागती माणसाने दिव्यांग व्यक्तींची खिल्ली उडवणारी अनेक मोठी विधाने आणि अनेक गोष्टी केलेल्या आहेत. जगात अनेक विदुषक असतात. मात्र ते स्वतःची खिल्ली उडवून हसे मिळवतात. या समय रैना नावाच्या माणसाने ती हद्द परिपूर्ण पार करून दिव्यांगांवरती विनोद करीत स्वतःच्याच अकलेचा घडा किती रिकामा आहे हे दाखवून दिले आहे. यापूर्वी विश्वविख्यात नाटककार राम गणेश गडकरी यांनी एका नाटकामध्ये इंदू काळे आणि सरला भोळे या दिव्यांग व्यक्तीत्वांवर केलेली टीका त्याकाळी कोणाच्याही मनाला भावली नव्हती. आता हा लेकाचा समय रैना नावाचा भंगड माणूस दिव्यांगांवर अयोग्य आणि अनुचित अशी टीका करतो आहे. त्यामुळेच देशाच्या सर न्यायाधीशांना समयला समज देण्यासाठी योग्य समयावर व्यक्त व्हावे लागलेले आहे. या सरकलेल्या मेंदूच्या समय नावाच्या विदूषकाला सर न्यायाधीशांनी कठोर भाषेत शांतपणे समजावलेले आहे. यापुढे अशा प्रकारे दिव्यांगांवर विनोद करणे थांबवले नाही, तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशाराही आपल्या सरन्यायाधीशांनी दिलेला आहे. त्यासोबतच अनेक दिव्यांग आपल्या कर्तृत्वाने वलयांकित आहेत यशस्वी आहेत आणि एका वेगळ्या बुलंद उंचीवर पोहोचलेले आहेत. त्यांच्यातील त्या गुणांचा प्रचार कर, यापेक्षा दुसरा विचार करू नकोस हे सांगून सर न्यायाधीशांनी ज्या पद्धतीने या समय रैनाचे कान टोचलेले आहेत किंवा उपटलेले आहेत. त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


### भारताच्या पहिल्या खासगी ऑर्बिटल रॉकेट

# विक्रमचे अनावरण

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २७ :
भारताच्या पहिल्या खासगी ऑर्बिटल रॉकेट विक्रम-क चे अनावरण पंतप्रधान मोदी यांच्याहस्ते आज सकाळी ११ वाजता करण्यात आले. हे रॉकेट खासगी अंतराळ कंपनी स्कायक्रूट एरोस्पेसने बनवले आहे. यासोबतच पंतप्रधान मोदी यांनी कंपनीच्या नवीन इन्फिनिटी कॅम्पसचेही उद्घाटन केले.



या कॅम्पसमध्ये अनेक लॉन्च व्हेईकलच्या डिझाइन, डेव्हलपमेंट, इंटिग्रेशन आणि टेस्टिंगचे काम केले जाईल. हा कॅम्पस तेलंगणातील हैदराबाद येथे बनवण्यात आला आहे. कंपनीचे मुख्यालयही येथेच आहे. पंतप्रधान व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले.

स्कायक्रूट एरोस्पेस कंपनीची स्थापना पवन चंदना आणि भरत ढाका यांनी २०१८ मध्ये केली होती. हे दोघेही आयआयटी पदवीधर आहेत आणि इस्रोचे माजी शास्त्रज्ञ राहिले आहेत. अथक प्रयत्नातून त्यांनी हे यश संपादन केले.

### २१ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी

## वर्ल्ड बँकेचा ४३७२ कोटींचा निधी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
महाराष्ट्रातील नानाजी देशमुख कृषी संजीवन प्रकल्पाच्या (पोकरा) दुसऱ्या टप्प्यासाठी जागतिक बँकेने ४३७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला.

या निधीतून संभाजीनगर, नागपूर, नाशिकसह २१ जिल्ह्यांमधील ५ हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न ३० टक्क्यांनी वाढण्यास मदत होईल. यामध्ये प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भातील दुष्काळग्रस्त गावांचा समावेश आहे.

बँकेने एका निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रोजेक्ट ऑन क्लायमेट रेझिलियंट अ‍ॅग्रिकल्चर फेज २ प्रकल्पासाठी ४९ कोटी डॉलर्सचा निधी (४३७२ कोटी रुपये) मंजूर केला. हा प्रकल्प नानाजी देशमुख कृषी संजीवन प्रकल्प या नावानेही ओळखला जातो. अचूक शेती पद्धतींमध्ये (प्रिसिजन फार्मिंग) डिजिटल तंत्रज्ञान वापरून पिकांची उत्पादकता वाढवेल आणि लवचिकता आणेल. या पद्धतीत पिके आणि जमिनीला चांगल्या आरोग्यासाठी आणि उत्पादकतेसाठी नेमके काय हवे आहे, हे तंत्रज्ञानाद्वारे सुनिश्चित केले जाते.

### बोगस जन्म-मृत्यू दाखले

## धडाकेबाज कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
राज्यात बोगस जन्म-मृत्यू दाखल्यांच्या रॅकेटवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कारवाईचे आदेश दिले आहेत. केवळ आधार कार्डच्या पुराव्यावर मिळालेले किंवा संशयास्पद दाखले तत्काळ रद्द करा आणि संबंधितांवर गुन्हा दाखल करा, अशा सूचना महसूल विभागाने आज सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.

राज्यभरातील तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना सोळा मुद्यांनुसार प्रत्येक दाखल्याची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले असून, गृह विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीनंतर या कारवाईला गती मिळाली.

सुधारित नियमांनंतर नायब तहसीलदारांनी दिलेले जन्म-मृत्यू दाखल्यांचे आदेश सरसकट परत घेऊन रद्द करण्यास सांगण्यात आले आहे. केवळ आधार कार्डावर आधारित दाखले त्रुटीपूर्ण मानले जातील, असा स्पष्ट शब्दांत इशारा महसूल विभागाने दिला आहे. आधार हा जन्माचा पुरावा नाही, हे केंद्राच्या मार्गदर्शक सूचनांचा हवाला देत पुन्हा अधोरेखित करण्यात आले आहे. विशेष मोहीम राबवून सर्व प्रकरणांची तपासणी तातडीने पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले.

अर्जातील जन्मतारीख आणि आधारवरील माहितीमध्ये तफावत आढळली तर तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश आहेत.

# आगीमुळे ४४ जणांचा मृत्यू

### २७९ जखमी; ३५ मजली ८ इमारतींमध्ये बांबूच्या मचानमुळे पसरली आग

■ वृत्तसंस्था, हाँगकाँग, दि. २७ :
हाँगकाँगमध्ये ताई पो नावाच्या परिसरात बुधवारी एका मोठ्या निवासी संकुलाला आग लागली. या दुर्घटनेत आतापर्यंत ४४ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर २७९ जखमी आहेत.

हे संकुल एकूण आठ इमारतींचे होते, ज्यात प्रत्येक इमारत ३५ मजली होती. यात सुमारे दोन हजार अपार्टमेंट होते. वांग फुक कोर्टचे हे टॉवर बांबूच्या मचानने झाकलेले होते. आग इमारतींच्या बाहेर लावलेल्या याच मचानपासून सुरू झाली, ज्यावर दुरुस्तीचे काम सुरू होते. वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे आणि जळणाऱ्या ढिगाऱ्यामुळे आगीच्या ज्वाळा एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीपर्यंत पसरत गेल्या.

ही आग इतक्या वेगाने पसरली की अनेक इमारती तिच्या कचाट्यात सापडल्या. गेल्या अनेक दशकांतील हाँगकाँगमधील ही सर्वात प्राणघातक आग मानली जात आहे. हे कॉम्प्लेक्स एकूण आठ इमारतींचे होते, ज्यात सुमारे दोन हजार अपार्टमेंट होते.

जेव्हा आग लागली, तेव्हा अनेक लोकांना त्याची कल्पनाही नव्हती कारण दुरुस्तीच्या कामामुळे खिडक्या बंद होत्या. अनेक वृद्ध वेळेवर बाहेर पडू शकले नाहीत. ४० वर्षांपासून तिथे राहणाऱ्या एका रहिवाशाने सांगितले की, त्यांचे अनेक शेजारी वृद्ध आहेत आणि ते लवकर बाहेर पडू शकले नाहीत.

अनेक मजल्यांवर तापमान इतके जास्त होते की अग्निशमन दलाचे जवान त्या ठिकाणी पोहोचूही शकत नव्हते. याच दरम्यान एका अग्निशमन दलाच्या जवानाचा मृत्यूही झाला. किती लोक बेपत्ता आहेत आणि किती लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे, याचा शोध पोलीस सध्या घेत आहेत. पोलिसांनी



तीन जणांना अटकही केली आहे, ज्यांच्यावर आगीच्या प्रकरणात निष्काळजीपणा किंवा सदोष मनुष्यवधाचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

आसपासच्या अनेक इमारतीही रिकाम्या केल्या जात आहेत आणि जवळचे रस्ते बंद करण्यात आले आहेत. हाँगकाँग सरकारने सांगितले आहे की वांग फुक कोर्ट कॉम्प्लेक्समध्ये आग लागल्यानंतर तात्पुरती निवारा केंद्रे उघडण्यात आली आहेत. ही निवारा केंद्रे क्वॉन्ग फुक कम्युनिटी हॉल आणि तुंग चेओंग स्ट्रीट लेझर बिल्डिंगमध्ये तयार करण्यात आली आहेत.

## उभ्या कंटेनरला कारची धडक, दोन ठार

■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. २७ :
भरधाव अनियंत्रित झालेल्या कारने उभ्या कंटेनरला दिलेल्या धडकेत कार मधील दोन जणांचा जागीच मृत्यू, तर सात जण जखमी झाले. ही घटना गुरुवार २७ नोव्हेंबर रोजी सकाळी सातच्या सुमारास मुंबई कोलकत्ता राष्ट्रीय महामार्ग ५३ वरील नैनपूर/डुग्गीपार जवळच्या पेट्रोल पंपासमोर घडली.

द्रोणा नरेश साहू व देवेंद्र कतलम (वय २५, दोघेही रा. पाटण बरबसपूर, जि. दुर्ग, छत्तीसगड) अशी मृतांची नावे आहेत. राष्ट्रीय महामार्ग वरील कोहमारा नजिकच्या नैनपूर/डुग्गीपारजवळ असलेल्या पेट्रोलपंपासमोर रस्त्याच्या बाजूला कंटेनर उभा होता.




नागपूरकडून रायपूरकडे जाणाऱ्या अर्टीगा कारने उभ्या कंटेनरला जोरात धडक दिली. या अपघातात कार चेंदामेंदा झाली असून, कारमधील द्रोणा नरेश साहू व देवेंद्र कतलम यांचा जागीच मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. जखमींमध्ये एक तीन वर्षाचे मुल, दोन महिला, चार पुरुषांचा समावेश आहे. त्यांना गोंदियाच्या केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. कारमधील एक महिला व एक पुरुष सुरक्षित आहे. कारमधून लहान मुलांसह अकरा महिला-पुरुष प्रवास करीत होते. या घटनेची नोंद डुग्गीपार पोलिसांनी केली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार विजय कोटांगले यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

## इम्रान खानच्या मृत्यूच्या अफवा



■ वृत्तसंस्था, इस्लामाबाद, दि. २७ :
पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या मृत्यूबाबत सोशल मीडियावर अफवा वेगाने पसरत आहेत. इम्रान ऑगस्ट २०२३ पासून रावळपिंडी येथील अडियाला तुरुंगात बंद आहेत.

गेल्या ३ आठवड्यांपासून इम्रानच्या बहिणी त्यांना भेटण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु तुरुंग प्रशासन त्यांना परवानगी देत नाही. यामुळे इम्रान यांच्या खराब तब्येतीबद्दल तर्कवितर्क लावले जात आहेत. इम्रान यांच्या बहिणींनी सरकारकडे सत्य सांगण्याची मागणी केली आहे. तुरुंग प्रशासनाने सांगितले आहे की इम्रान खान यांची तब्येत पूर्णपणे ठीक आहे.

## अमेरिकेत व्हाईट हाऊसजवळ अफगाण निर्वासिताचा गोळीबार

■ वॉशिंग्टन डीसी : अमेरिकेत व्हाईट हाऊसपासून दोन ब्लॉक दूर झालेल्या गोळीबारात नॅशनल गार्ड्सचे दोन सदस्य गंभीर जखमी झाले. या प्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

एफबीआय अधिकाऱ्यांच्या मते, हल्ल्यात सामील असलेल्या संशयिताची ओळख रहमानुल्लाह लाकनवाल अशी झाली आहे. तो ऑगस्ट २०२१ मध्ये अफगाणमधून अमेरिकेत आला होता.

हा हल्ला फॅरागट वेस्ट मेट्रो स्टेशनजवळ झाला, जिथे लाकनवाल काही काळ वाट पाहत होता आणि नंतर अचानक त्याने गोळीबार सुरू केला. त्याने आधी एका महिला गार्डच्या छातीत गोळी मारली आणि नंतर डोक्यात. यानंतर त्याने दुसऱ्या गार्डवर गोळीबार केला. त्याच वेळी जवळच असलेल्या तिसऱ्या गार्डने धावपळ करून हल्लेखोराला ताब्यात घेतले.

## चीनमध्ये मोठा रेल्वे अपघातः ११ ठार

■ बीजिंग : चीनच्या दक्षिणेकडील युन्नान प्रांतात गुरुवारी सकाळी झालेल्या रेल्वे अपघातात ११ रेल्वे कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आणि २ जण जखमी झाले. भूकंपाशी संबंधित उपकरणांची चाचणी करणारी एक चाचणी ट्रेन अचानक कर्मचाऱ्यांशी धडकल्याने हा अपघात झाला.

हा अपघात कुनमिंग शहरातील लुओयांगजेन रेल्वे स्थानकावर झाला, जिथे रेल्वे कर्मचारी वळणाच्या ट्रॅकवर काम करत होते. त्याचवेळी ट्रेन त्याच ट्रॅकवर आली आणि धडक झाली. २०११ मध्ये झालेल्या रेल्वे अपघातानंतरची ही दुसरी सर्वात मोठी दुर्घटना आहे. तेव्हा रेल्वे अपघातात ४० लोकांचा मृत्यू झाला होता.

## माजी राष्ट्राध्यक्षला २७ वर्षांची शिक्षा

■ ब्राझिलिया : ब्राझीलचे माजी राष्ट्राध्यक्ष जायर बोल्सोनारो (७०) यांना तेथील सर्वोच्च न्यायालयाने सत्तापालटाच्या कटाच्या प्रकरणात २७ वर्षांची शिक्षा सुनावली. त्यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी २०२२ च्या राष्ट्रपती निवडणुकीत पराभव होऊनही सत्तेत राहण्यासाठी सध्याचे राष्ट्राध्यक्ष लुला डी सिल्वा यांचे सरकार पाडण्याचा कट रचला होता.

सुनावणीदरम्यान बोल्सोनारोच्या कायदेशीर पथकाने न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अंतिम अपील केली नाही, त्यानंतर न्यायमूर्ती अलेक्झांड्रे मोराएस यांनी २७ वर्षांची शिक्षा लागू करण्याचा आदेश दिला.

## दीप्ती शर्माला यूपीने ३.२ कोटींना विकत घेतले

### डब्लूपीएलचा पहिला मेगा लिलाव

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २७ :
महिला प्रीमियर लीगचा पहिला मेगा लिलाव नवी दिल्ली येथे सुरू आहे. भारताच्या दीप्ती शर्माला सर्वाधिक बोली लागली, उत्तर प्रदेश वॉरियर्सने तिला ३.२० कोटी मध्ये खरेदी केले. मुंबई इंडियन्सने न्यूझीलंडच्या अमेलिया केरला ३ कोटी मध्ये जोडले.



ऑस्ट्रेलियाची कर्णधार आणि यष्टीरक्षक एलिसा हिली ही पहिली बोली लावण्यात आली होती, परंतु ती विकली गेली नाही. गुजरातची सोफी डेव्हिनला दिल्लीने २ कोटी मध्ये खरेदी केले. दिल्लीला तीन अंतिम फेरीत नेणारी कर्णधार मेग लॅनिंग उत्तर प्रदेश संघात १.९० कोटी मध्ये सामील झाली.

दीप्तीला सुरुवातीला दिल्लीने ५० लाख मध्ये खरेदी केले. त्यानंतर उत्तर प्रदेशने त्यांच्या राईट टू मॅच कार्डचा वापर करून तिची किंमत ३.२० कोटीपर्यंत वाढवली.

दीप्ती शर्मा ही सर्वात महागडी खेळाडू होती, ३.२० कोटीमध्ये तिला यूपी वॉरियर्सने खरेदी केले. अमेलिया केरला मुंबईने ३ कोटी, सोफी डेव्हाईनला गुजरातने २ कोटी आणि मेग लॅनिंग यूपीने १.९० कोटी मध्ये खरेदी केले. दिल्लीने शेनेल हेन्रीला १.३० कोटी, लॉरा वोल्वार्डला १.१० कोटी आणि श्री चरणीला १.३० कोटी मध्ये खरेदी केले.

### ५८% निधी परदेशी खेळाडूंवर खर्च

आतापर्यंत मेगा लिलावात २७ खेळाडू खरेदी करण्यात आले आहेत. पाच फ्रँचायझींनी एकूण २५.१५ कोटी खर्च केले आहेत. यापैकी १०.४५ कोटी भारतीय खेळाडूंवर आणि १४.७ कोटी परदेशी खेळाडूंवर खर्च करण्यात आले आहेत. फ्रँचायझींकडे अजूनही १५.९५ कोटी शिल्लक आहेत.

## काश्मीरच्या ५ जिल्ह्यांत पोलिसांचे सर्च ऑपरेशन

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २७ :
जम्मू-काश्मीरमधील ५ जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी पोलीस आणि सुरक्षा दलांनी मोठ्या प्रमाणावर शोध मोहीम राबवली. पोलिसांनी बंदी घातलेल्या दहशतवादी संघटना जमात-ए-इस्लामीशी संबंधित असल्याच्या संशयावरून अनेक लोकांच्या घरांची झडती घेतली.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, खोऱ्यातील सुरक्षा मोहिमेअंतर्गत शोपियां, पुलवामा, श्रीनगर, बारामुल्ला आणि कुलगाममध्ये झडती घेण्यात आली आहे. या दरम्यान, पोलीस पथकांनी पडताळणी केली आणि अनेक लोकांची चौकशीही केली.

या ऑपरेशनचा उद्देश बंदी घातलेल्या संघटनांना पुन्हा सक्रिय होण्यापासून रोखणे, दहशतवादी समर्थन नेटवर्क आणि ओव्हरग्राउंड कार्यकर्त्यांना ओळखून त्यांना संपवणे हा आहे. तसेच, दहशतवाद्यांना आर्थिक आणि लॉजिस्टिक मदत करणाऱ्यांवर कारवाई करणे हा आहे.

पोलिसांनी सांगितले की, परिसरात बेकायदेशीर गतिविधी आढळल्यास कारवाई केली जाईल. स्थानिक लोकांना सहकार्य करण्याचे आणि संशयास्पद गतिविधींची माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीत झालेल्या बॉम्ब स्फोटाच्या पार्श्वभूमिवर ही कारवाई केली जात आहे.



# जल पर्यटन विषयक कामांना अखेर स्थगिती

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २७ :
गोसीखुर्द प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या बुडीत क्षेत्रावर जलपर्यटन विषयक भंडारा नगर पालिकेमार्फत सुरु असलेल्या दोन कामांकरिता जलसंपदा विभागाची आवश्यक परवानगी घेण्यात आली नाही. त्यामुळे या दोन्ही कामांना स्थगिती देण्याबाबतचे आदेश गोसेखुर्द प्रकल्प मंडळ नागपूरचे अधीक्षक अभियंता यांनी मुख्याधिकारी भंडारा यांना आज दिले.

जिल्ह्यातील जलपर्यटनाच्या नावाखाली शासनाच्या निधीचा पूर्णतः दुरूपयोग तसेच दलित बांधवांवर अन्याय करून एकाच कामाचे दोनदा बिले काढून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करीत उबाठा शिवसेनेचे प्रमुख संजय रेहपाडे यांनी याबाबतचे निवेदन भाजपचे आमदार परिणय फुके यांना दिले.

आमदार फुके यांनी जल पर्यटन कामात झालेल्या भ्रष्टाचाराचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी या जल पर्यटन विषयक कामांची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना दिले होते.

### लोकप्रतिनिधीला जोर का झटका

गोसीखुर्द प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या बुडीत क्षेत्रावर जलपर्यटन विषयक कामे सुरू करण्यात आली. त्यात ऑफिसर्स कल्ब मागे वैनगंगा नदीकाठी व कारधा पूलाजवळील वैनगंगा नदीकाठच्या भागाचा समावेश आहे.

तथापि, या करीता जलसंपदा विभागाची आवश्यक परवानगी घेण्यात आली नसल्याने जलसंपदा विभागाचे हददीतील उपरोक्त कामे पुढील आदेश येईस्तोवर तात्काळ स्थगीत करण्यात यावे असे आदेश कार्यकारी अभियंता गोसीखुर्द धरण विभाग वाही (पवनी) यांनी भंडारा मुख्याधिकारी यांना दिले आहेत.

सध्या जल पर्यटनाचे काम सुरू आहे, ती जागा नगरपरिषद, भंडाराच्या अखत्यारित नसतांना देखील दलित वस्ती व नागरी सुविधा व सेवा निधी पर्यटन व सौंदर्यीकरणाच्या कामात खर्च करण्यात आला असून शासनाच्या निधीचा सुद्धा गैरवापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने जलपर्यटन प्रकल्पासह दलित वस्ती योजनेतील कामांसाठी शासनाने ३८ कोटी रूपयांचा निधी दिला असून, आर्या कन्स्ट्रकशन कंपनीने केलेल्या सुमारे ११.५० कोटी रुपयांचे बिल अदा करून नंतर पुन्हा तिच कामे दुसऱ्या हेडमध्ये टाकून कामे न करताच श्रेयन इंफ्रास्ट्रक्चर या कंपनीने उर्वरित २७ कोटी रुपयांपैकी काही बिले उचलले व काही उचलण्याचा मार्गावर आहेत.

वरील सर्व कामांचे निविदा तुकड्या तुकड्यात करून कामे न करताच बोगस बिले काढून शासनाची फसवणूक व निधीचा गैरवापर केला आहे. महत्वाचे म्हणजे, दलित घटकांसाठी व राखीव गटासाठी हा निधी असतांना तसेच कोणतेही नोंदणी प्रमाणपत्र किंवा कायदेशीर पात्रता नसताना बाहेरील कंपनींसोबत करार करण्यात आला.

यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता झालेली आहे, ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची व बेकायदेशीर दिसून येत आहे, असा आरोप या निवेदनातून उबाठाचे जिल्हाप्रमुख रेहपाडे यांनी केला होता.



समाजक्रांतीचे जनक
महात्मा जोतिराव फुले
यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र
अभिवादन...!

अभिवादनकर्ते


भगवान गंगाधर भांदुर्गे
रिसोड तालुकाध्यक्ष,
सत्यशोधक समाज


सौ. मुक्ताताई भ. भांदुर्गे
आशा सेविका पिंपरी सरहद्द,
बाल संगोपन समिती अध्यक्ष, रिसोड


रामेश्वर भ. भांदुर्गे
पिंपरी सरहद्द,
ता. रिसोड, जि. वाशिम

## पैशाच्या जोरावर मतांची मागणी
### शरद पवारांचा महायुतीवर निशाणा



**बारामती :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पैशांचा वापर करून मते मागितल्या जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी गुरुवारी सांगितले की, मतदारसंघांमध्ये केलेल्या कामांवर नव्हे तर निधीवर मते मागितली जात आहेत. शरद पवार म्हणाले की, केलेल्या किंवा नियोजित कामांवर नव्हे तर बजेट आणि निधी देण्याच्या आश्वासनावर मते मागितली जात आहेत. ही चांगली गोष्ट नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्थानिक पातळीवर लढवल्या जातात. त्यामुळे या निवडणुकांमध्ये राजकारण आणू नये. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वेगवेगळ्या पक्षांमध्ये गटबाजी निर्माण होताना मला दिसते आहे, परंतु त्यांच्यात एकता नाही. जनता हुशार आहे. जनता त्यांना घ्यायचे असलेले निर्णय घेईल. शरद पवार म्हणाले की, माझ्यासारख्या लोकांनी पूर्वी या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे फारसे लक्ष दिले नव्हते आणि आजही ते फारसे लक्ष देणार नाहीत. निवडणुका काही दिवसांवर आहेत, त्यामुळे पाहूया काय होते... पवारांचे हे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा महायुतीचे नेते स्थानिक निवडणुकीत मतदारांना पैशाचे आमिष दाखवत असल्याचा आरोप आहे. अजित पवार यांनी प्रचार दौऱ्यादरम्यान म्हटले होते की, "मी राज्याचा अर्थमंत्री आहे आणि अर्थसंकल्प सादर करणे माझ्या अधिकारात आहे. मला मतदान करा, आणि मी तुमच्या मतदारसंघात अर्थसंकल्प सादर करेन." भाजप नेत्यांनी नंतर सांगितले की देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि ते प्रभारी आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांभोवती सुरू असलेल्या या भाषणबाजीत, शरद पवार यांनी सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना कोण किती पैसे वाटू शकते यावर विचार करण्यास सांगितले आहे. ही एक स्पर्धा दिसते. जर पैशाच्या आधारे निवडणुका जिंकण्याचे ध्येय असेल, तर या मुद्द्यावर मौन बाळगणे शहाणपणाचे ठरेल. महाराष्ट्रात २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर रोजी निवडणुका होणार आहेत. या स्थानिक निवडणुकांमध्ये सर्व पक्षांनी त्यांचे प्रमुख नेते उभे केले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे देखील राज्याच्या वेगवेगळ्या भागात प्रचार करत आहेत.

# एक कोटी महिलांना लखपती बनवणार
## फडणवीस यांची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी, उदगीर, दि. २७ :**

लाडकी बहीण योजनेवरून अफवांचा बाजार सुरू असतानाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत ते पदावर आहेत, तोपर्यंत ही योजना बंद होणार नाही. गुरुवारी उदगीरमध्ये आयोजित प्रचार सभेत त्यांनी घोषणा केली की, महाराष्ट्रातील एक कोटी महिलांना ही योजना लखपती बनवेल. उदगीर नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ जिल्हा परिषद मैदानावर झालेल्या सभेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. सभेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लाडकी बहीण योजना बंद होणार असल्याच्या अफवा चुकीच्या आहेत. ते म्हणाले, जोपर्यंत देवा भाऊ आहे, तोपर्यंत ही योजना चालू राहील. यामुळे महाराष्ट्रातील एक कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्याची संधी मिळेल. नगरपालिका आमच्या ताब्यात द्या, आम्ही शहराचा विकास करतो. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडकी बहीण योजना सुरु केल्याच्या श्रेयवादावरही थोडक्यात भाष्य केले आणि लखपती दीदी योजना प्रभावीपणे



राबवण्यात येणार असल्याचे सांगितले.

याशिवाय, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्यात नागरिकांसाठी १२ आजारांवर पाच लाख रुपयांपर्यंतचा मोफत उपचार याआधी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत उपलब्ध होता. आता नागरी मागणीनुसार या योजनेत २४ रोगांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यापैकी नऊ रोगांवर वीस लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याची परवानगी दिली गेली आहे. माजी मंत्री आमदार संजय बनसोडे सभेचे अध्यक्ष होते, तर माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा, माजी मंत्री निलंग्याचे आमदार संभाजी पाटील, लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड, औशाचे आमदार अभिमन्यू पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर आणि माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांसारखे पक्षप्रमुख उपस्थित होते.

याच सभेत माजी आमदार आणि नगराध्यक्षांचे भाजपात प्रवेश झाल्याचीही माहिती देण्यात आली. लातुर ग्रामीणचे माजी आमदार अँड त्र्यंबक भिसे, लातुरचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे आणि निलंग्याचे माजी आमदार अमोल आर्य यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मात्र, कार्यक्रम सुरू होण्यापूर्वीच जिल्हा भाजपाचे नेते मंडळी त्यांच्या प्रवेशाचे कार्यक्रम पूर्ण करून टाकले, त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पक्ष प्रवेशाचा उल्लेख केला नाही.

## मतदारयाद्या जाहीर करण्यास दहा दिवसांची मुदतवाढ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**

महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदारयाद्यांच्या प्रारुपात अनेक चुका असल्याचा विरोधकांचा आक्षेप तसेच मुंबईत ११ लाख नावे दुबार असल्याची मुंबई महानगरपालिकेनेच दिलेल्या कबुलीनंतर मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदारयाद्या जाहीर करण्यास १० दिवसांची तर हरकती व सूचनांसाठी राज्य निवडणूक आयोगाने सात दिवसांची मुदतवाढ दिली आहे. यानुसार याद्या आता २२ डिसेंबरला जाहीर केल्या जातील.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम आयोगाने काही दिवसांपूर्वी जाहीर केला होता. १ जुलै२०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित करण्यात आली असून त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या महापालिका निवडणुकीसाठी वापरण्यात येणार आहेत.

## मुंबईसह महानगर प्रदेश गुजरातला जोडण्याचा डाव : राज ठाकरे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**



चंदीगड प्रमाणे मुंबई ताब्यात घेण्याचा तर महानगर प्रदेश शेजारील गुजरात राज्याला जोडण्याचा केंद्र सरकारचा डाव असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी केला. ठाकरे यांच्या आरोपानंतर बाँबे आणि मुंबईच्या वादावरुन राजकारण सुरु होताच मुंबईतील बाँबेच्या खुणा संपल्याच पाहिजेत अशी राज्य सरकारची भूमिका असून आयआयटीचेही मुंबई असे नामकरण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.

पवई येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेत(आयआयटी) आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केंद्रीय विज्ञान-तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी मुंबईत आयआयटीच्या कार्यक्रमात बोलताना, आयआयटी बाँबेचे नाव आयाआयटी मुंबई केले नाही यासाठी देवाचे आभार मानतो. आयआयटीच्या नावातील बॉबे तसेच ठेवले त्याचे मुंबई केके नाही, हे चांगलेच झाले असे विधान केले होते. जितेंद्र सिंग यांच्या या वक्तव्यावरुन बाँबे विरुद्ध मुंबई असा वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे.

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सिंग यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेत केंद्र सरकारला चंदीगड प्रमाणे मुंबई ताब्यात घ्यायची असून जितेंद्र सिंग यांचे विधान हे सरकारच्या मानसिकतेचे एक प्रतीक असल्याचे स्पष्ट दिसत असल्याचा आरोप केला आहे. राज ठाकरे यांनी समाजमाध्यमाच्या माध्यमातून आपली भूमिका स्पष्ट करताना केंद्र सरकारडा डाव हाणून पाडण्यासाठी मराठी माणसाने जागे व्हावे असे आवाहन केले आहे.

### दमदाटी करून चालत नाही, प्रत्येकाचा फुगा फुटतो
## अजित पवारांचा राजन पाटलांवर थेट हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**

मोहोळ तालुक्यातील अनगर नगरपंचायतीत गेल्या काही दिवसांपासून राजकीय वातावरण तापले होते. अनेक वर्षांपासून या नगरपंचायतीवर राजन पाटील यांचे वर्चस्व होते. ते राष्ट्रवादीतून भाजपमध्ये गेले आणि त्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाल्याचे दिसून आले. सत्ता कायम ठेवण्यासाठी विविध राजकीय हालचाली घडत होत्या. म्हणूनच 17 जागा बिनविरोध करून दाखवणाऱ्या पाटील यांची ताकद दाखवली. मात्र, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीतच नवा संघर्ष उभा राहिला. राजन पाटलांची सून उमेदवार असताना, अजित पवार गटाकडून उज्वला थिटे यांना उमेदवारी देण्यात आली. यानंतर गावात दडपशाही, धमकी यांसारख्या घडामोडी घडल्याच्या चर्चा चांगल्याच रंगल्या. उज्वला थिटे यांचा अर्ज तांत्रिक कारणावरून बाद केला गेला आणि या वादाची ठिणगी आणखी भडकली.

उज्वला थिटे यांनी या निर्णयाला कोर्टात आव्हान दिले मात्र, न्यायालयानेही याचिका फेटाळली. तरीही त्या माघार घेण्याच्या मूडमध्ये



नव्हत्या. त्यांनी लढा सुरूच राहील, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली. त्यानंतर हा मुद्दा सोलापूरच्या वडाळा भागातील कार्यक्रमात गाजला. त्या कार्यक्रमात अजित पवार यांनी उज्वला थिटे यांचा सत्कार करून त्यांना मजबूत पाठबळ दिले. यावेळी त्यांनी कोणाचेही नाव न घेता, राजन पाटील यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. लोकशाहीमध्ये सर्वांना निवडणूक लढण्याचा अधिकार आहे, दमदाटी करून काही चालत नाही, प्रत्येकाचा फुगा एके दिवशी फुटतो, मस्ती दाखवणाऱ्यांना लोक खड्यासारखे बाजूला फेकतात, अशा कठोर शब्दांत त्यांनी टीका केली आहे.

महिला सोनं करतात, त्यांना संधी मिळाली पाहिजे, म्हणत अजित पवार यांनी उज्वला थिटे यांच्या पाठिशी ठाम उभे राहण्याचा संदेश दिला. आपल्या लाडक्या बहिणी इथे आहेत, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि सन्मानासाठी आम्ही आहोत्र, असे म्हणत त्यांनी आगामी राजकीय लढाईची दिशा सूचित केली. महिलांसाठीच्या योजनांची माहिती देताना, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी लाडकी बहिणी योजना सुरू केली. संपूर्ण राज्यात लाखो महिलांना त्याचा फायदा निश्चित होणार आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या भाषणात महिलांचा सन्मान, हक्क आणि राजकारणातील सहभाग या मुद्द्यांवर विशेष भर होता.

अजित पवारांचा सूर पूर्ण भाषणभर आक्रमक होता. गावचे बोरी तेच गावचे बाभळी, अशा म्हणीच्या माध्यमातून त्यांनी स्थानिक राजकारणातील संघर्ष स्पष्ट दाखवून दिला. कोणी अरे म्हणाल तर कारे म्हणणारे आपण आहोत, अशा वाक्यांतून त्यांनी कार्यकर्त्यांना उभारी दिली.

## शरद पवार गटाच्या नेत्यावर जीवघेणा हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. २७ :**



बीड जिल्ह्याच्या सीमेजवळ बुधवारी रात्री शरद पवार गटाचे नेते आणि सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याने राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे. रात्री उशिराच्या सुमारास मांदगावजवळ नगर-सोलापूर महामार्गावर दहा ते पंधरा जणांच्या मुखवटा बांधलेल्या टोळक्याने त्यांची गाडी अडवून जोरदार हल्ला केला. दगडफेक, गाडीची तोडफोड आणि त्यानंतर धारदार शस्त्रांनी जिवे मारण्याचा प्रयत्न करत हल्लेखोरांनी राम खाडे यांना गंभीर जखमी केले. त्यांच्यासोबत असलेले सहकारीही मारहाणीमुळे गंभीररीत्या जखमी झाले आहेत. या हल्लूयानंतर या घटनेत राजकीय कटकारस्थान असल्याची शंका अधिक तीव्र झाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, राम खाडे आपल्या सहकाऱ्यांसह मांदळी गावातील एका हॉटेलमधून जेवण करून बीडकडे परतत होते. अचानक अंधारात हल्लेखोरांनी गाडीच्या समोर अडथळा आणला आणि जोरदार दगडफेक सुरू केली. साईड मिरर फोडत वाहनाची मोठी हानी केली. त्यानंतर लाठ्या, तलवारी, पिस्तूल आणि सत्तूर घेऊन हल्लेखोरांनी थेट गाडीत घुसण्याचा प्रयत्न केला. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी खाडे यांनी काही वार हातावर झेलले, परंतु हल्ला अत्यंत आक्रमक असल्याने त्यांच्या हाताला खोल जखमा झाल्या. परिस्थिती इतकी गंभीर होती की रुग्णालयात दाखल होईपर्यंत त्यांची शुद्ध गेली होती आणि शरीर रक्तबंबाळ झाले होते. हल्लूयानंतर त्यांना तात्काळ अहिल्यानगरमधील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती अधिकच चिंताजनक होत गेल्याने तातडीने त्यांना पुढील उपचारांसाठी पुण्यात हलविण्यात आले. रुग्णालय प्रशासनानेही त्यांच्या प्रकृतीवर गंभीर असल्याचे म्हटले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दुसरीकडे या घटनेनंतर स्थानिक पोलिसांनी तपास सुरू केला असला तरी हल्लेखोरांची ओळख अद्याप पटलेली नाही. घटनास्थळावरून एका हल्लेखोराच्या हातातून सत्तूर खाली पडल्याचे व्हिडीओमध्ये दिसत असून पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे प्राप्त झाले आहेत.

दरम्यान, खाडे यांच्या जखमी सहकारी दीपक खिळे यांनी या हल्लूयामागे थेट राजकीय द्वेष असल्याचा दावा केला आहे. त्यांच्या मते, राम खाडे अनेक भ्रष्टाचार प्रकरणे उघडकीस आणण्यात आघाडीवर होते. त्यांनी विविध स्तरांवर तक्रारी केल्याने काही व्यक्तींना मोठा फटका बसणार होता. त्यामुळेच बदला घेण्यासाठी नियोजनपूर्वक हा जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यांविरोधात आवाज उठवल्याची शिक्षा आम्हाला देण्यात आली, असेही त्यांनी म्हटले आहे.

### पैशांचा वापर करून निवडणुका खरेदी करायच्या
## हा भाजपचा खरा फॉर्म्युला : रोहित पवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**



मालवण नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि विरोधकांमध्ये राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. मालवणमधील भाजप कार्यकर्त्याच्या 25 लाखांची रोकड सापडल्याप्रकरणी भाजपवर थेट पैशांच्या जोरावर निवडणूक जिंकण्याचा आरोप होत असताना आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावरून भाजपवर घणाघाती हल्ला चढवला आहे. सत्तेचे सर्व सुख भोगायचे आणि त्याच पैशांचा वापर करून निवडणुका खरेदी करायच्या, हा भाजपचा विजयाचा खरा फॉम्युर्ला आहे, असा आरोप करत त्यांनी भाजपचा पार्टी विथ डिफरन्स, हा दावा खोटा असल्याचे स्पष्ट केले.

मालवणमधील नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या दौऱ्यानंतर मालवणमधील भाजप कार्यकर्त्याच्या घरी 25 लाख रुपयांची रोकड आढळल्याने मोठा खळबळ उडाली आहे. यावरून शिवसेना शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे यांनी थेट भाजप आणि रवींद्र चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप लावले. या आरोपाची चर्चा शांत होण्याआधीच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी भाजपला चांगलेच धारेवर धरत राणेंचे समर्थन केले आणि त्यामुळे राजकीय वातावरण आणखी पेटले आहे.

नीलेश राणे यांनी केलेल्या आरोपांनुसार, मालवणमधील विजय किंजवडेकर या भाजप कार्यकर्त्यांच्या घरी 25 लाखांची रोकड ठेवण्यात आली होती आणि या पैशांचा उपयोग मतदारांना पैसे वाटपासाठी होणार होता. राणे यांनी असा दावा केला की, भाजप निवडणुकीत पैसा खर्च करून विजय मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच अशा पद्धतीने निवडणूक प्रक्रिया डागाळली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. रवींद्र चव्हाण ज्या ज्या जिल्ह्यात येतात, तेथे पैसे वाटपाचे वातावरण तयार होते, असा आरोपही राणेंनी केला.

या प्रकरणावर बोलताना राणेंनी आणखी धक्कादायक खुलासे केले. त्यांच्या मते, मालवणमध्ये किमान आठ ते दहा घरांमध्ये पैशांच्या बॅगा ठेवल्या आहेत आणि रोज खास यंत्रणेमार्फत त्या बॅगा कार्यकर्त्यांकडे पोहोचवल्या जातात. पप्पा तवटे, मोहन सावंत, रणजीत देसाई आणि रुपेश कानडे हे कार्यकर्ते पैसे वाटण्याचे काम करतात, असा आरोप राणेंनी केला. भाजप सत्तेत आली तर विकास नव्हे, तर लोकसत्तेची लूट करण्यासाठीच नगरपरिषदेवर कब्जा करण्याची योजना असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांनी निवडणूक आयोग आणि पोलिसांकडे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही केली आहे.

या सर्व आरोपांनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार मैदानात उतरले आहेत. त्यांनी थेट भाजपला इशारा देत म्हटले की, निवडणुका जिंकण्यासाठी पैसाच हा भाजपचा खरा फॉम्युर्ला आहे. यात कुठलीच चाणक्यनीती नाही.

### भुसावळ विभागात प्रवाशांच्या सुविधेसाठी
## १५ स्थानकांवर ४९ एटीव्हीएमची सुविधा

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २७ :**



प्रवाशांना तिकिटांसाठी रांगेत न थांबता जलद आणि सुलभ पद्धतीने तिकीट मिळावे, डिजिटल तिकीटिंगला प्रोत्साहन मिळावे आणि सेल्फ-टिकिटिंगची संस्कृती वाढीस लागावी या उद्देशाने रेल्वे प्रशासनाकडून विविध स्थानकांवर ऑटोमॅटिक टिकट व्हेंडिंग मशीन उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच क्यूआर कोड आणि यूपीआय आयडीद्वारे डिजिटल पेमेंटची सुविधाही अधिक सक्षम करण्यात आली आहे. भुसावळ विभागात प्रवाशांच्या सुविधा लक्षात घेऊन एकूण 15 स्थानकांवर 49 एटीव्हीएम बसविण्यात आले आहेत. या मशीनचा सहज उपयोग करता यावा यासाठी १२ प्रशिक्षित सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली असून हे सहाय्यक स्थानक परिसरात प्रवाशांना एटीव्हीएमद्वारे तिकीट कसे काढायचे याबाबत मार्गदर्शन करत आहेत.

भुसावळ विभागातील देवलाली, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, अमरावती, बुरहानपूर आणि खंडवा या प्रमुख स्थानकांवर एटीव्हीएमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एटीव्हीएमचा वापर, त्याचे फायदे आणि विशेषतांचा माहिती करून देणारी सूचना फलक स्थानकांवर लावण्यात आली आहेत. एटीव्हीएमचा वापर वाढविण्यासाठी वाणिज्य विभागातील निरीक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या टीमकडून जनजागृती केली जात आहे.

## बसच्या धडकेत अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. २७ :**

पुणे-सातारा रस्त्यावर पीएमपी बसच्या धडकेत एका अनोळखी पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. श्री शंकरमहाराज मठासमोर ही घटना घडली. अपघातानंतर बसचालक घटनास्थळावरून पळून गेला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे-सोलापूर रस्त्यावरील श्री शंकरमहाराज मठासमोरील बीआरटी मार्गातून जात असलेल्या एका पादचाऱ्याला भरधाव वेगात आलेल्या पीएमपी बसने धडक दिली. पादचारी गंभीर जखमी झाला होता. जखमी पादचाऱ्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. अद्याप मृताची ओळख पटलेली नाही. या प्रकरणी पोलीस शिपाई अकिल तडवी यांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# अपप्रवृत्तींकडून संगमनेरचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न




## बाळासाहेब थोरात यांचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी संगमनेर, दि. २७ :**

सतत गोंधळ असलेल्या नगर परिषदेत १९९१ मध्ये सत्ता आल्यानंतर आपण आदर्श शिस्त लावली. विविध विकास कामांमधून संगमनेर शहर उभे केले. सततच्या पाणीटंचाईवर मार्ग काढत, आता मुबलक प्रमाणात शुद्ध पाणी शहराला मिळत आहे. सुसंस्कृत, शांतता आणि बंधूभावाचे वातावरण निर्माण करण्यातही यश आले.

मात्र मागील एक वर्षामध्ये काही अपप्रवृत्ती येथील वातावरण बिघडण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे संगमनेर शहराची वैभवशाली परंपरा जपण्यासाठी सर्वांनी पालिका निवडणुकीत सेवा समितीच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहावे, असे आवाहन काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

शहरातील विविध भागांत झालेल्या प्रचार सभांत ते बोलत होते. खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार सत्यजित तांबे यांच्यासह संगमनेर सेवा समितीचे उमेदवार उपस्थित होते. यावेळी मतदारांशी संवाद साधताना थोरात म्हणाले की, पालिकेतील ३० वर्षांच्या कार्यकाळात एकदाही वाद न होता, एकमताने सर्व ठराव मंजूर झाले. शहरासाठी आपण सातत्याने निधी आणून विकास कामे मार्गी लावली. शहरामध्ये अद्यावत बसस्थानक, पंचायत समिती, प्रांत, तहसील या कार्यालयांच्या उत्तुंग इमारती उभारल्या. सततची पाणीटंचाई हा शहरातला सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता. आपल्या प्रयत्नातून निळवंडे धरणातून ३८ किमी.ची जलवाहिनी टाकून शहरासाठी पाणी आणले. नवीन पाण्याच्या टाक्या उभारण्याबरोबरच जुनी जलवाहिनी बदलत नवीन जलवाहिनीचे जाळे शहरभर विस्तारले. त्याचा परिणाम म्हणून आज शहराला मुबलक प्रमाणात पाणी मिळत आहे. ही सगळी कामे आपोआप झालेली नाहीत, त्यामागे सततचा पाठपुरावा होता.

दंगलींचे शहर ही ओळख पुसून सर्वधर्मसमभाव जपणारे शहर अशी नवी ओळख संगमनेरला मिळाली. मात्र आता बिघडत चाललेले वातावरण पाहून चिंता वाटते. वर्षभरामध्ये शहरात अमली पदार्थांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. थेट पोलीस ठाण्यात, पोलीस अधिकाऱ्यांसमोर मारामाऱ्या करण्यापर्यंत गुंडागर्दी वाढली आहे. यामागे कोण आहे हे तुम्ही ओळखा, असे असे सांगतानाच आपले पूर्वीचे शांत सुसंस्कृत आणि सर्वधर्मसमभाव जपणारे शहर ही ओळख टिकवण्यासाठी मतदारांनी सेवा समितीच्या उमेदवारांना पाठबळ देण्याच्या आवाहन त्यांनी केले.

संगमनेरकरांनी संगमनेरकरांसाठी तयार केलेले राजकीय व्यासपीठ म्हणजे सेवा समिती असल्याचा पुनरुच्चार करत आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, शहर विकासाच्या वाटचालींना नवा आयाम देण्यासाठी संगमनेर-२ राबविण्यात येणार आहे. शहरात गरिबांसाठी पक्के घरे देण्याचा मानस असून माजी मंत्री थोरात यांच्या संपकार्मुळे प्रत्येक मंत्र्याकडून निधी आणण्याची ताकद आपल्यामध्ये आहे. शहराच्या विकासासाठी कुठेही निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही दिली.

### मुंबईचा अपमान करणार असाल तर याद राखा
## उद्धव ठाकरे गटाची भाजपवर सडकून टीका

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २७ :**

मुंबईचे बारसे पोतुर्गीजांनी केले, अशी समजूत करून घेऊन बॉम्बेच्या प्रेमात पडणाऱ्यांची अवलाद येथे आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांचे बॉम्बे प्रेम हे त्यांच्या मानसिक गुलामीचे लक्षण आहे. अयोध्येच्या राममंदिरावर धर्मध्वजा फडकवून पंतप्रधान मोदी म्हणाले, भारताला गुलामीच्या मानसिकतेतून मुक्त करू, पण त्यांच्या मंत्रिमंडळात बॉम्बेची चाटूगिरी करणारे, पोतुर्गीज बापाची चाटूगिरी करणारे मंत्री बसले आहेत. त्यांना काय शिक्षा देणार? डॉ. जितेंद्र सिंह यांना मराठी जनांचे जोडे खावेच लागतील. या जोडेमारीत भाजप, अजित पवार व मिंधे लोक सामील होतात काय तेच पाहायचे? पोतुर्गीज बापाच्या गुलामांनो, मुंबईचा अपमान करणार असाल तर याद राखा, अशा शब्दांत उद्धव ठाकरे गटाने भाजपवर टीका केली आहे. दैनिक सामनाच्या माध्यमातून ठाकरे गटाने सरकारला खडे बोल सुनावले आहेत.

भाजपच्या डोक्यात मुंबई-महाराष्ट्राविषयी कोणते कारस्थान शिजते आहे त्याचा भंडाफोड केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केला. डॉ. सिंह मुंबईत येऊन म्हणाले की, आयआयटी बॉम्बेच्या नावातील बॉम्बे तसेच ठेवले. त्याचे मुंबई केले नाही हे चांगलेच झाले. त्यामुळे मी खूश आहे. हे विधान मुंबादेवीचा अपमान करणारे आहे. जितेंद्र सिंह यांना हे असे बोलण्याची अजिबात गरज नव्हती, पण त्यांनी हे विधान केले. मोदी-शहा-अदानी यांच्या डोक्यात काय सुरू आहे ते डॉ. सिंह यांनी जाहीर केले. डॉ. सिंह हे पंतप्रधानांचे निकटवर्तीय आहेत. हे महाशय जम्मूमधून निवडून येतात व मुंबईत येऊन बॉम्बेचा उदो उदो करतात. त्यांना संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि इतिहास कोणीतरी समजावून सांगायला हवा.

महाराष्ट्राला मुंबई मिळाली ती दिल्लीशी लढा देऊन आणि बॉम्बेचे मुंबई केले तेदेखील संघर्ष करून. डॉ. सिंह यांना मात्र बॉम्बेचाच तोरा मिरवायचा आहे. बॉम्बेची तरफदारी करणाऱ्या डॉ. सिंह यांच्यावर महाराष्ट्रात गुन्हाच दाखल व्हायला हवा, पण इतका महाराष्ट्र स्वाभिमान फडणवीसांच्या मिंध्या सरकारात शिल्लक आहे काय? स्वतःस शिवसेना म्हणवून घेणाऱ्या टोळ भैरवांकडून डॉ. जितेंद्र सिंह यांच्या बॉम्बे प्रेमावर साधा निषेधाचा सूर निघालेला दिसत नाही. मुंबईची अवहेलना करून एक केंद्रीय मंत्री येथून सरळसोट निसटतो हे राज्य सरकारचे अपयश आहे. महाराष्ट्र प्रेमाचे ढोंग करणारे लोक सरकारात आहेत. त्यांचे महाराष्ट्र प्रेम तकलादू आहे. मुंबईवर भाजपच्या दिल्लीकर नेतृत्वाची सुरुवातीपासूनच वाईट नजर आहे. गेल्या दहा वर्षांपासून मुंबईची पद्धतशीर लूट सुरू आहे. मुंबई ही मुंबई राहू नये व ती एकतर गुजरातच्या पोटात घालावी, नाहीतर दिल्लीची आश्रित व्हावी यासाठी शथीर्चे प्रयत्न सुरू आहेत.

## पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवत फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २७ :**

भोसरी पोलिस ठाण्यात निलंबित पोलिस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी यांच्यासह दोन साथीदारांवर 93 लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. '20 महिन्यात पैसे दुप्पट' किंवा '4 टक्के व्याज' देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

फिर्यादी संतोष बालकृष्ण तरटे (वय 43, रा. रहाटणी, पुणे) यांनी 12 नोव्हेंबर 2025 रोजी भोसरी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, निलंबित पोलिस उपनिरीक्षक प्रमोद चिंतामणी (सध्या आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी-चिंचवड येथे निलंबित) यांनी 2023 मध्ये तरटे यांना 'पैसे गुंतवा, 20 महिन्यात दुप्पट करून देईन' असे आमिष दाखवले होते. या आमिषाला बळी पडून तरटे यांनी चिंतामणी यांच्याकडे 18 लाख रुपये गुंतवले. मात्र, 20 महिने उलटूनही त्यांना केवळ 15 लाख 40 हजार रुपये परत मिळाले. उर्वरित 20 लाख 60 हजार रुपये परत न करता चिंतामणी यांनी फसवणूक केल्याचा आरोप तरटे यांनी केला आहे. चिंतामणी यांनी अशाच पद्धतीने इतर सहा नागरिकांचीही फसवणूक केली आहे. साक्षीदारांच्या जबाबातून एकूण 93 लाख रुपयांची फसवणूक उघड झाली. यात आनंद पिंगळे (40 लाख), बिस्मिल्ला शेख (10 लाख), शांताराम भोंडवे, गणेश खारगे, शीतल पाटील, बापूसाहेब खेंगरे (प्रत्येकी 5 लाख) यांचा समावेश आहे.

महासागर •शुक्रवार,दि.२८ नोव्हेंबर २०२५

# अकोला

पान 3

## प्रारूप मतदार यादी वरील हरकती व सुचना संदर्भात
## अकोला महानगरपालिका आयुक्त यांनी घेतला आढावा

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करीता मा.राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अकोला महानगरपालिका प्रशासन द्वारा दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी पासून अकोला मनपाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे नागरिकांच्या हरकती व सुचना घेण्यासाठी प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.



या अनुषंगाने आज दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे सदर ठिकाणी भेट देऊन आढावा घेण्यात आला असून आज पर्यंत एकुण २८४ हरकती प्राप्त झाल्या आहे. मनपा मुख्य सभागृह येथे प्रारूप मतदार यादी वर हरकती व सुचना घेण्यासाठी एकुण २० कर्मचारी कार्यरत आहे.यावेळी मनपा आयुक्त यांनी कर्मचा-यांशी संवाद साधून त्यांना येणा-या अडी-अडचणी बाबत विचारणा केली.

तसेच आलेल्या हरकती वर प्रत्यक्ष मतदारांशी भेट घेऊन व स्थळ निरीक्षण करून हरकती व सूचना निकाली काढण्याबाबतची कार्यवाही सुरू असून यासाठी एक पर्यवेक्षक, एक स्वच्छता निरीक्षक, एक कनिष्ठ अभियंता आणि एक कर वसुली लिपिक असलेले २० प्रभागांसाठी २० पथके कार्यान्वीत करण्यात आले.

## संविधान दिनी मुंबई बॉम्ब स्फोटातील शहिदांना अभिवादन

**अकोला:** संविधान आत्मा असून सामाजिक न्याय आणि सामाजिक समरसता सोबत प्रत्येकाला संविधानाने हक्क दिले आहे. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिलेली अनमोल देण असून २६ नोव्हेंबर रोजी शहीद झालेल्या मुंबई बॉम्बस्फोट मधील शहिदांना अभिवादन करणे हे सुद्धा कर्तव्य आहे असे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी केले.लक्ष्मण भिकाजी गोडबोले हुतात्मा स्मारक गौरक्षण रोड येथे भारतीय जनता पार्टी तर्फ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते संविधान दिवसाचे महत्त्व संविधानाची शपथ तसेच २६ ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या शहिदांना अभिवादन कार्यक्रमात ते बोलतहोते.खासदार अनुप भाऊ धोत्रे, महानगर अध्यक्ष जयंतराव मसने,माजी महापौर विजय अग्रवाल, किशोर मांगटे, कृष्णा शर्मा, वसंत बाछुका, गिरीश जोशी, माधव मानकर, विनोद मनवानी, संजय गोटफफोडे, अॅड. देवाशिष काकड, रमेश अलकरी, संतोष पांडे, वैशाली शेळके, पवन महल्ले उपस्थित होते.

## प्रत्येकाने मतभेद,जात-पात विसरून एकात्मतेने नांदावे व देशाला एकात्मतेतून सशक्त व आत्मनिर्भर बनवावे :उपविभागीय अधिकारी




▪मुर्तिजापुर,दि २७ (प्रतिनिधी) :
लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांचे आदेशांन्वे मेरा युवा भारत केंद्र, अकोला ,उपविभागीय कार्यालय मुर्तिजापुर, तहसील कार्यालय मुर्तिजापुर यांच्या संयुक्तविद्यमाने दिनांक २१ /११/ २०२५ रोजी सकाळी आठ वाजता मा.श्री संदीपकुमार अपार,उपविभागीय अधिकारी यांनी सदर पदयात्रेला हिरवी झेंडी दाखवत श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सुरुवात झाली. यावेळी मुख्य अतिथी मा. शिल्पाताई बोबडे, तहसीलदार मूर्तिजापूर, महेश सिंह शेखावत,जिल्हा युवा अधिकारी, मेरा युवा भारत केन्द्र, अकोला , यांची मुख्य उपस्थिती लाभली. श्री .छत्रपती शिवाजी महाराज चौक इथून पदयात्रेला सुरुवात होउन- श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालय- भगतसिंग चौक मार्गे आठवडी बाजार- तहसील कार्यालय -तालुका क्रीडा संकुल, मूर्तिजापूर येथे समारोप करण्यात आला .अपार साहेब यांनी मुलांना मार्गदर्शन करत प्रत्येकाने मतभेद,जात-पात विसरून एकात्मतेने नांदावे व देशाला एकात्मतेतून सशक्त व आत्मनिर्भर बनवू या असा मोलाचा संदेश उपस्थित युवांना दिला. सरदार वल्लभाई पटेल यांच्या योगदानाला व कार्याला डोळ्यासमोर ठेऊन देशाच्या उज्वल भविष्यासाठी पदक्रमण करावे असे मत त्यांनी मांडले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध संदेशाचे फलक हाती घेऊन पदयात्रेमध्ये सहभागी झाले होते. भारत माता की जय, वंदे मातरम, सरदार पटेलांच्या घोषणा देत पदयात्रा क्रीडा संकुल येथे पोहचली. उपस्थितांना आत्मनिर्भर भारत, नशा मुक्त भारत अभियान अशा शपथ घेऊन राष्ट्रगिताने पदयात्रेचा समारोप झाला. मेरा युवा भारत केंद्र, अकोला चे तालुका समन्वयक विलास वानखडे विलास नसले यांनी पदयात्रेमध्ये भारतमातेच्या घोषणा देत उपस्थित विद्यार्थी युवायुती सह सर्वांचा जोश वाढविला . पदयात्रेमध्ये शासकीय कर्मचारी,कला ,क्रीडा, सांस्कृतिक ,सामाजिक ,पोलीस कर्मचारी ,पत्रकार बांधव , विविध शाळेचे प्राचार्य ,प्राध्यापक, शिक्षक, एनरजेटिक फिटनेस कल्ब ,पतंजली योग समिती, फौजी फिजिकल अकॅडमी ,जि के अँकडमी ,सोल्जर फिटनेस अकॅडमी इत्यादींनी सहभाग घेऊन एकता चे दर्शन घडविले.

## शेतकऱ्यांचा १२ क्विंटल कापूस खरेदी करा : वाल्मिक भगत

▪अकोट,दि २७ (प्रतिनिधी) :
भारतीय कापूस महामंडळ द्वारा हमीभावात कापूस खरेदी करतांना अन्यायकारक अटी व शर्ती लावून नुसते हेलपाटे देण्याचा प्रकार सुरु आहे. शेतक-यांचा केवळ एकरी ५.६०क्विंटल खरेदी करण्यात येत आहे ही मर्यादा वाढवून किमान एकरी १२ क्विंटल कापूस खरेदी करावा अशी जोरदार मागणी किसान ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष वाल्मिक भगत यांनी केली आहे.या मागणीला कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी समर्थन दिले आहे

अतिवृष्टीने आधीच हतबल झालेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांची शासनाने दिलासा देण्या ऐवजी थट्टा चालविली आहे पिक पाहणी ,कापूस नोंदणी,स्लॉट नोंदणी तथा मार्केटला प्रथमच हातभर दांडू गाडीत टाकून ओलावा तपासणी व त्यावर भाव कमी करणे,आधार कार्ड, सातबारा उतारा यापूर्वी ऑनलाईन अपलोड केल्यावर पुन्हा मागणी करणे ओटीपी या सारख्या झंझटीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांची मजाच घेतली जात आहे.या आडमुठ्या धोरणाने शेतकरी हैराण झाला आहे.त्यात केवळ एकरी ५.६०क्विटल कापूस खरेदी केला जात आहे.यावर्षी एकरी २०-२५क्विंटल पिकणारा कापूस १०-१२क्विंटल पिकेल असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.हा उर्वरित कापूस नाईलाजाने कमी भावात विकण्याची दुदैवी पाळी शेतक-यांनवर आली आहे. तेव्हा कापूस खरेदीची मर्यादा १२क्विंटल करावी अशी मागणी किसान ब्रिगेड घ्या बैठकीत करण्यात आली आहे.असे निवेदन संबंधीतांना देण्यात येत आहे,मागणीची तात्काळ पूर्तता करण्यात न आल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## कालेखा नगरातून गाय लंपास

**पातूर :** शहरातील कालेखा नगर परिसरातून अज्ञात चोरट्यांनी ५० हजार रुपये किमतीची एक गाय चोरून नेल्याची घटना २५ नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आली आहे. हबीब खान जरदार खान यांनी नेहमीप्रमाणे आपली गाय आणि तिचे चार महिन्यांचे वासरू घराच्या बाजूला बांधून ठेवले होते. मात्र, २४ नोव्हेंबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी ही गाय चोरून नेली.

## शिरसोली येथे शनिवारी भव्य शौर्य दिनाचे आयोजन

▪तेल्हारा,दि २७ (प्रतिनिधी) : तेल्हारा तालुक्यातील शिरसोली येथील युद्धभूमीवर दि. २९ नोव्हेंबर शनिवारी भव्य शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आल्याचे झालेल्या बैठकीत ठरवण्यात आले आहे या दिवशी शहिदांना मानवंदना तथा या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेआहे

सन २९ नोव्हेंबर १८०३ रोजी सतत सात दिवस ब्रिटिश व भारतीयांमध्ये या ठिकाणी घनघोर युद्ध झाले होते या युद्धात ब्रिटिशांचा सेनापती कॅप्टन केन सह शेकडो ब्रिटिश मारल्या गेले होते तर भारतीयांचे १८ पगड जातीचे सैनिक शहीद झाले होते ब्रिटिश सध्याही सातासमुद्रापलीकडून या ठिकाणी दरवर्षी मानवंदना देण्यास येतात मात्र भारतीयांना याचा

**▪विविध शाळांचे शेकडो विद्यार्थी होणार सहभागी**

विसर पडला होता मात्र दैनिक देशोन्नती ने गेल्या कित्येक वर्षापासून वृत्त प्रकाशित करून पाठपुरावा केला त्यानंतर या ठिकाणी भारतीयांचे वतीने मानवंदनांना देण्यासह अनेक कार्यक्रम आयोजित करणे सुरू झाले निव्वळ एक दिवस कार्यक्रम न करता या ठिकाणी भव्य स्मृती स्तंभाची उभारणी व्हावी अशी मागणी होत आहे आता नुकताच याबाबत बैठक संपन्न झाली २९ नोव्हेंबर शनिवारी याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले विशेष म्हणजे यावेळी अचलपूर येथील स्वराज्य प्रतिष्ठानचे वतीने भव्य शस्त्रागाराचे प्रदर्शन होणार असून तर परिसरातील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत एकंदरीत या दिनाचे महत्त्व भारतीयांचे कायमस्वरूपी स्मरणात राहावे असा हा कार्यक्रम यावर्षी आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले तरी भारतीयांनी या शौर्य दिनाला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजन समितीतर्फे कॅप्टन सुनील ढोबाळे; संघर्ष सावरकर ;प्रा वाल्मीक भगत; अविनाश डिक्कर ;अनंत गावंडे; रामदास मंगळे साहेब; संतोष झांमरे सर; सुनील जायले ;रंजीत ठाकरे; प्रशांत भारसाकडे ;संजय बोचे ;पंजाब गावंडे ;नाजूकराव मानकर; दिनेश कुलट ;रामेश्वर पडोळे;ऋषिकेश खोटरे ;निलेश नागमते यांनी केले आहे.

## थोडक्यात

### वॉर्डामध्ये मोकाट श्वानांचा मुक्तसंचार

बाळापुर : शहरात मोकाट श्वानांचा हैदोस वाढला असून अनेक नागरिकांना याचा त्रास होत आहे. वयोवृद्ध नागरिक आणि बालकावर मोकाट श्वान हल्ले करत आहेत. परंतु, बाळापूर नगरपंचायत प्रशासन श्वानांचाबंदोबस्त करण्याकडे दुर्लक्ष करत आहे. शहरातील अनेक वॉर्डामध्ये मोकाट श्वानांचा समूह सकाळी आणि सायंकाळी बावरत असतो. त्या मुळे नागरिकांना ये-जा करण्यासाठी भीती निर्माण होते. भटक्या श्वानांची प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारची निर्बिजीकरण किंवा लसीकरण करण्यात आले नसल्याने श्वान चावल्यास धोका होण्याची भीती आहे. वर्षभरात शहरात भटक्या श्वानांनी चावा घेतलेल्या रुग्णांवर उपचारही करण्यात आले. मात्र, भटक्या श्वानांचा अजूनपर्यंत बंदोबस्त करण्यात आलेला नाही. नगरपरिषद अंतर्गत शहरातील भटक्या श्वानांना ठेवण्यासाठी एकही निवारागृह नाही. त्यामुळे नगरपरिषद अंतर्गत भटक्या स्वानांसाठी उपाययोजना करतायेणार नाही, असे चित्र सध्यातरी दिसून येत आहे.सर्वोच्चन्यायालयानेसार्वजनिक ठिकाणाहून भटक्या स्वानांना हटवणे तसेच त्यांना निवारागृहामध्ये ठेवणे, जागा निश्चित करणे, नसबंदी आणि लसीकरण करणे, पायाभूत सुविधा तयार करणे यासारख्या सूचना दिलेल्या आहेत. भटक्या श्वानाचे टारगेट वयोवृद्ध नागरिक तसेच लहान बालके असतात. त्यांना तातडीने पळता येत नाही. त्यामुळे भटके श्वान त्यांच्यावर हल्ला करतात.

### स्वामी समर्थ केंद्रात अखंड नाम जप

**अकोट** : श्री दत्त जयंती उत्सवाचे औचित्य साधून स्थानिक यशोदा नगरस्थित श्री स्वामी समर्थ सेवा आध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्रात २७ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. २८ नोव्हेंबरला मंडल स्थापना स्थापित देवता हवन,अग्निस्थापना नित्य स्वाहाकार, २९ नोव्हेंबरला श्री गणेशयाग, मनोबोध याग, ३० नोव्हेंबरला श्री स्वामी याग, १ डिसेंबरला श्री गीताई याग, २ डिसेंबरला ३ डिसेंबरला श्री रुद्रयाग, श्री मल्हारी याग, ४ डिसेंबरला बलि पूणाहुती दुपारी १२.३९ वाजता श्री दत्त जन्मोत्सव, श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन व अखंड नाम जप यज्ञ सप्ताहाची सांगता होईल.

## बनावट नोटांच्या घबाडचे मूर्तिजापूर कनेक्शन

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
मध्यप्रदेशातील भोपाळ येथील गोकुलधाम सोसायटीत सुरू असलेल्या बनावट नोटांच्या कारखान्यावर एसआयटीने छापा टाकत तीन आरोपींना गाठले. या टोळीचा राज्यभर पसरलेला नेटवर्क अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूरपर्यंत पोहोचल्याचे धक्कादायक तपासात निष्पन्न झाले आहे.मुख्य सूत्रधार डॉ. प्रतीक नवलाखे याच्याकडून ४० लाखांच्या बनावट नोटा छापल्याचे उघड झाले. नवलाखेने मौलानामार्फत विविध 'पाट्या' शोधून नोटा पुरवल्या. यात नागपूर, धुळे, मालेगाव, जळगाव, चंद्रपूरसोबत अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर व धारणी हे महत्त्वाचे टार्गेट बाजार होते, असे पोलिस तपासात पुढे आले.अटक आरोपींमध्ये धारणी येथील जिल्हा परिषद शाळेचा प्रभारी मुख्याध्यापक दिनेश गोरे असल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. सीईओ यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिले.भोपाळमध्ये फूड अँड ट्रॅव्हल्स या व्यवसायाच्या आड हा गोरखधंदा सुरू होता. बऱ्हाणपूर, जळगाव-भुसावळ येथेही नवलाखे याच्यावर गुन्हे नोंद आहेत. जप्तीमध्ये बनावट नोटा, लॅपटॉप, एटीएम कार्डे, ड्रायर मशीन आदी मुद्देमाल मिळाला.खंडवा अतिरिक्त पोलिस अधीक्षक महेंद्र तारणेकर यांनी सांगितले की, मूर्तिजापूरसह विविध शहरांत या टोळीने बनावट नोटांचा पुरवठा केला, त्यामुळे आणखी बड्यांचा उलगडा होण्याची शक्यता आहे.

## लकडगंज परिसरात दोन गटांमध्ये वाद; ११ जणांवर गुन्हा दाखल

**अकोला :** रामदास पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या लकडगंज परिसरात सोमवारी रात्री उशिरा दोन गटांमध्ये झालेल्या वादातून परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. घटनेची माहिती समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांनी स्थानिक पोलीस दलासह आरपी प्लाटूनची तात्काळ मदत घेत घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी केलेल्या तातडीच्या व आक्रमक कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये मोठी दहशत निर्माण झाली व पुढील अनिष्ट प्रकार टळला. घटनेदरम्यान काही व्यक्तींमध्ये गंभीर वाद होऊन मोठा गोंधळ उडाला होता. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर

परिस्थिती नियंत्रणात आली. त्यानंतर दोन्ही गटातील व्यक्तींनी पोलीस ठाण्यात येऊन आपापसात

## जात वैधता प्रमाणपत्राचे ऑनलाईन प्रणालीद्वारे वाटप

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
भारतीय संविधानाला २६ नोव्हेंबर २०२५ रोजी ७५ वर्ष पूर्ण झाली असून २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधानाचा अमृत महोत्सव म्हणून साजरा करण्यात आला आहे. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने २६ नोव्हेंबर संविधान दिनाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, निमवाडी अकोला येथे करण्यात आले आहे.तसेच सामाईक परिक्षा २०२५ नुसार निकाल जाहिर झालेला आहे. सामाईक परिक्षेनंतर उच्च शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमानुसार प्रवेश निश्चित करण्यासाठी ११ वी, १२ वी, विज्ञान शाखेतील नविन प्रवेशीत असलेल्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्याकरिता विद्यार्थी यांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अकोला या कार्यालयात आवश्यक लागणाऱ्या कागदपत्रासह परीपुर्ण असलेली प्रकरणे सादर करण्यात आलेले होते. अशा विद्यार्थ्यांना संविधान दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त समितीने निर्णय घेऊन एकूण २७५ जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आले आहे.संविधान दिनाच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला संविधानाच्या उद्देशिकाचे सामुहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त तथा सदस्य अमोल यावलीकर उपस्थित राहून त्यांनी भारतीय संविधानावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जिल्हा व महिला बालविकास अधिकारी गिरीष पुसतकर उपस्थित होते. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त मारोती वाठ यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे अभिजीत काळे व प्रमुख वक्ते मुंबई हायकोर्ट अॅड. सचिन माहोकार व प्रकल्प अधिकारी समातदुत बार्टी श्री. बेदरकर इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

## खानापूर रस्त्यावर दुर्लक्षित कामकाजाचा बळी

**▪ दगड लागून संजय नाभरे गंभीर जखमी डाव्या डोळ्याला खोल जखम, चार टाके; व्यवसाय ठप्प**

▪पातुर,दि २७ (प्रतिनिधी) :




गेल्या अनेक वर्षांपासून दुरुस्ती व बांधकामाच्या प्रतीक्षेत असलेला खानापूर-टिटवी चौक मार्ग आजही अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. रस्त्यावरील असंख्य खड्डे, पसरलेली लहान-मोठी दगडे आणि प्रशासनाचे सातत्यपूर्ण दुर्लक्ष यामुळे हा रस्ता आता अपघातप्रवण बनला आहे. अनेकांनी उपोषणे, निवेदने, रास्ता रोको यांसारखे आंदोलनात्मक मार्ग अवलंबूनही परिस्थितीत काहीच बदल न झाल्याने ग्रामस्थांमध्ये मोठा रोष आहे.

याच दुर्लक्षित कारभाराचा प्रत्यय पुन्हा एकदा रविवारी आला. खानापूर येथील रहिवासी संजय नाभरे हे रस्त्यालगत उभे असताना, वेगाने जाणाऱ्या वाहनाच्या टायराखाली दगड उडून थेट त्यांच्या डाव्या डोळ्यावर आदळला. या गंभीर अपघातात त्यांच्या डोळ्याला खोल जखम झाली असून रुग्णालयात चार टाके घालावे लागले आहेत. सध्या त्यांच्यावर खासगी दवाखान्यात उपचार सुरू असून तीव्र वेदना आणि डोळ्याचा त्रास कायम आहे.

संजय नाभरे यांचा खानापूर रोडवर किरकोळ व्यवसाय असून रस्त्यालगत खाद्यपदार्थांची विक्री करून ते उपजीविका करतात. डोळ्याच्या जखमीमुळे त्यांचा व्यवसाय पूर्णपणे ठप्प झाला आहे. उपचार खर्च, व्यवसायातील तोटा आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे ते अत्यंत मानसिक तणावात आहेत.

## समतेची मूल्ये पाळल्यासच लोकशाही मजबूत :अॅड आकाश हिवराळे





▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
जगातील सर्वात मोठी व महान लोकशाही म्हणून भारताकडे आदराने पाहिले जाते. त्याचे सर्व श्रेय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचेच आहे. पण जोपर्यंत आपल्याकडे सुशिक्षित आणि सुसंस्कारित मानवधन तयार होत नाही. तोपर्यंत याच संविधानाचा वापर आपल्या सोयीप्रमाणे लावला जाईल. मुळात संविधानाने भारतातील प्रत्येकाला मानवतावादी समतेच्या शांततेचा संदेश दिला, असे प्रतिपादन अॅड. आकाश हिवराळे यांने केले. ते पंचशिल नगर येथे आयोजित संविधान दिवसाच्या कार्यक्रमामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

स्थानिक वाशिम रोड बायपास येथील पंचशील नगरात २६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ महिला कार्यकर्त्या कुसुम वाकोडे या होत्या. दरम्यान परिसरातील भारतीय सैन्य दलात भरती झालेल्या वैभव शिरसाट व जयदीप बाबडे यांचा आई, वडिलांसह सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या लिलाबाई वाहुरवाघ, शिलाबाई गवई, वच्छला दाभाडे, विमल सदांशिव, शाहुबाई गोपणारायन, कुसूम खंडारे, सुमन क्षीरसागर, शांताबाई तायडे, शिला भारसाकळे, अनुसया सावळे, माया तायडे, गंगुबाई खंडारे, मनोरमा शिरसाट, कलावती तायडे, गऊबाई वानखडे, शीला दाभाडे, छाया पाखरे आदी उपस्थित होत्या.

## मराठा महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी श्री राम मुळे

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
दिनांक- अखिल भारतीय मराठा महासंघाची वार्षिक सर्व साधारण सभा दिनांक २३ - ११- २०२५ रोजी शिवाजीराव शिंदे सभागृह, मुंबई सेंट्रल, मुंबई येथे मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री दिलीप सिंह दादा जगताप यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेमध्ये सर्वानुमते मराठा महासंघाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी श्री संभाजी दहातोंडे पाटील यांची तर श्री राम मुळे अकोला यांची महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली तसेच श्री अनिल तागडे, पुणे यांची सुद्धा उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली व सरचिटणीस म्हणून विलास देसाई ,सांगली यांची निवड करण्यात आली. तसेच महेश सावंत, कोकण विभाग, उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी मागील वर्षातील उपक्रम व संघटनात्मक कार्याचा सविस्तर आढावा घेऊन आगामी वर्षासाठी संघटन विस्तार, सामाजिक उपक्रम, युवकांच्या व शेतकऱ्यांच्या समस्या व त्यांचा वाढता सहभाग तसेच शैक्षणिक सामाजिक प्रकल्प , अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास मंडळ व सारथी संस्थेचे उपक्रमाबाबत प्रचार व प्रसार करून युवकांपर्यंत पोहोचविणे त्यांना लाभ मि



ळवून देण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखणे आदि विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली.नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे उपस्थित पदाधिकारी व सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे महासंघाच्या कार्याला अधिक दिशा ,गती ,परिणामकता मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सभेला महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्रा बाहेरील अनेक राज्यातील पदाधिकारी कार्यकर्ते व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

अकोट : शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त सुरू झालेल्या शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा आठवा वर्धापन दिन ठाणे येथील मातोश्री गंगुबाई सभागृहात पार पडला. या कार्यक्रमात अकोट तालुक्यात वैद्यकीय व सामाजिक क्षेत्राच्या कार्यात केलेल्या निःस्वार्थ योगदानाबद्दल गौरव काटोले यांना पुरस्कार दिला.

**ANGEL ONE LIMITED**

Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093
Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in
Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX
Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,
NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| Gaurav Lakshman Shinganare | Gaurav Lakshman Shinganare | Shree Shivaji Nagar Mothe Barganakot Mothe Bargan Akola 444101 Maharashtra | NSE : AP0397295811 |
| Priyanka Sarwesh Agrawal | Priyanka Sarwesh Agrawal | Jalaram Society No.4,Behind Akashwani Kendra,Po. : Akola Dist : Akola 444001 Maharashtra | NSE : AP0397612851<br>BSE : AP01061201169934<br>MCX : MCX/AP/171438 |
| Devashish Sureshkumar Bhutada | Devashish Sureshkumar Bhutada | 306 B Wing Pushpa Kabir Apartmentasara Colony Akot Akola 444101 Maharashtra | NSE : AP0397627881 |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact ANGEL ONE LTD. within **15 days** from the date of issuing this notice.

Date : 28.11.2025
Place : Maharashtra

For ANGEL ONE LTD
Sd/-, Authorised Signatory

# १० हजार पेक्षा अधिक असलेले थकित पाणीपट्टी कर धारकांनी कराचा भरणा तात्काळ करावा, अन्यथा होणार नळ जोडणी खंडीत

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
अकोला महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये शहरातील नागरिकांना पाणी पट्टी कराचा भरणा करणे तसेच पाणी पट्टी देयका संदर्भातील काही तक्रार असल्यास त्याचे निराकरणार्थ शहरातील विविध भागात शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते, तसेच नागरिकांना पाणी पट्टी कराचा भरणा करण्याचे कार्य अधिक सोईचे व्हावे याकरिता ऑनलाईन कर भरण्याची (htts:// amcwaterbill.org) या संकेत स्थळाव्दारे सुविधासुध्दा देण्यात आली आहे. रूपये १० हजार पेक्षा अधिक असलेले नळ जोडणी धारकांनी आपल्या थकित पाणी पट्टी कराचा भरणा तात्काळ करावा अन्यथा त्यांच्याकडील नळजोडणी खंडीत करण्यात येणार असल्याबाबत मनपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कळिवले आहे.तरी शहरातील थकित पाणी पट्टी कर धारकांनी आपले थकित व चालू वर्षातील पाणी पट्टी कराचा भरणा करून नळ जोडणी खंडीत करण्या सारख्या अप्रीय कार्यवाही टाळून मनपा प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन मनपा प्रशासनाव्दारा करण्यात येत आहे.

# कर्जमुक्ती, हमीभाव व शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे केंद्र सरकारने तातडीने लक्ष द्यावे

## भारतीय किसान युनियनची जिल्हाधिकाऱ्यामार्फत पंतप्रधानांना निवेदन सादर

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
पाच वर्षांपूर्वी दिल्लीत झालेल्या ऐतिहासिक किसान आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय किसान युनियन आणि संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने केंद्र सरकारने दिलेली लिखित आश्वासने अद्याप पूर्ण न झाल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत भारतीय किसान युनियन अकोला जिल्हा शाखेने आज जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान , मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले. सुगत भटकर, अकोला जिल्हा प्रभारी, भारतीय किसान युनियन यांच्या नेतृत्व व समाजसेवक गजानन हरणे, विजय देशमुख, गजानन कदम, नंदकिशोर गावंडे, सुरेश



घोडके भारत कांबळे, मिलिंद इंगोले, न्यानेश्वर शेळके, धम्मपाल दामोदर, सचिन वानखेडे, अनिल कोकाटे, शेखर साबळे,आदी मान्यवरांच्या शिष्टमंडळाने हे निवेदन सादर केले . या निवेदनाद्वारे पाच वर्षांपूर्वीच्या आंदोलनात शहीद झालेल्या ७३६ शेतकऱ्यांच्या बलिदानाची आठवण करून दिली.
आंदोलनाच्या काळात केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांची लवकरात लवकर पूर्तता करू असे वचन दिले होते. मात्र, आज पाच वर्षे उलटूनही त्या मागण्या पूर्ण झालेल्या नसल्याने शेतकरी नाराज व अस्वस्थ असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.
त्यामध्ये प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे कर्जमुक्तीचा निर्णय तातडीने घ्यावा, केंद्र सरकारने अकरा वर्षांपासून सर्वसमावेशक कर्जमुक्ती केली नसल्याने शेतकऱ्यांवर प्रचंड आर्थिक ओझे वाढले आहे. हमीभाव कायदा लागू करावा ,शेतकऱ्यांच्या उत्पादनाला खात्रीशीर किंमत मिळावी यासाठी हा कायदा तत्कालीन आश्वासनाप्रमाणे लागू करणे अत्यावश्यक आहे.

# प्रभूकृपेसाठी जीवनात ध्यान-धारणा आवश्यक आहे.-पु.गोपाल महाराज

▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
जीवन हे चंचल आहे. या भौतिक युगात मन हे सदा अस्थिर व चंचल असते.ते मायेत अधीर असते.असे चंचल मन प्रभूप्राप्ती साठी अडसर ठरत असते.भक्तीसाठी चंचल मनाला स्थिर करण्याची आवश्यकता असून ही मानसिक स्थिरता केवळ ध्यान,धारणा, समाधी, संयम व एकाग्रतेने निर्माण होऊन प्रभूप्राप्ती होऊ शकत असल्याचा हितोपदेश वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेड कर यांनी केला.आशिष पवित्रकार मित्र परिवार व भागवत सेवा समिती च्या वतीने गुरुवर्य संत वासुदेव महाराज यांच्या स्मरणार्थ व स्व बाबुराव पवित्रकार यांच्या स्मृतीत जवाहर नगर येथील छत्रपती राजे संभाजी पार्क येथे सुरू असलेल्या वेदांताचार्य बालयोगी गोपाल महाराज कारखेड कर यांच्या श्रीमदब भागवत कथेत त्यांनी कथेचे तृतीय पुष्प गुंफले.ते म्हणाले,



जग हे खऱ्या अर्थाने चिंतनीय नसून मनुष्य हा चिंतनीय आहे.तो भोगाचे चिंतन करीत असतो.या उलट संत कधीच चिंतन करीत नाहीत.संतांच्या जीवनाचे अवलोकन केले तर असे दिसते की त्यांनी भोगादी वैभवाचा त्याग केला आहे. एकनाथानी वैभव त्यागून पांडुरंगाचे ध्यान केले.पांडुरंगच्या विश्वात आपला देह झिजविला. म्हणूनच ते भगवतांचे आवडते शिष्य बनलेत.ते पुढे म्हणाले, भक्तांनी शाश्वत सुखासाठी कलियुगात नामस्मरण करावे.नित्य त्याचे स्मरण करावे,'ठेविले अनंते तैसेचि राहावे,चित्ती असू द्यावे समाधान'ही तुकोबारायची वृत्ती अंगी निमिण करावी तरच आपण मोक्षाचे अधिकारी होऊ शकू असे सांगितले.भागवतचा उहापोह करतांना ते म्हणाले, कृष्णकथा ही जीवनाला तारणारी कथा असून ही कथा प्रेमाने प्रभू प्राप्ती होत असल्याचे सांगते.ज्ञानाने प्रभू प्राप्ती होत नसून ती केवळ प्रेमाने होत असल्याचे सांगून प्रेममय भक्ती अंगी निर्माण करण्याचे आवाहन पु गोपाल महाराज यांनी यावेळी केले.सर्वप्रथमपु गोपाल महाराज यांचे स्वागत माजी मंत्री डॉ रणजित पाटील,सचिन ढवळे, पंकज देशमुख, सुनील जानोलकर, निलेश देव,संजय चौधरी, निलेश खर्चे, उद्धव ठाकरे, नाना वाघ, निरंजन गव्हाळे, शेंगोकार, मनोज कस्तुरकर, निचळ, पुष्पा गुलवाडे आदींनी केले.

# तेल्हारा नगरपरिषद निवडणूक २०२५

▪तेल्हारा,दि २७ (प्रतिनिधी) :
नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये प्रभाग क्रमांक ३ (ब) मध्ये अपक्ष उमेदवार श्री. विशाल नांदोकार यांना नागरिकांचा अपेक्षेपेक्षा मोठा आणि उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती समोर येत आहे.
स्थानिक प्रश्नांवर भर, सोप्या भाषेत जनतेशी संवाद, तसेच प्रभागातील विकासाच्या मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका यामुळे मतदार सकारात्मकतेने प्रतिसाद देत असल्याचे चित्र दिसत आहे.
दरम्यान, भाजप, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उभाटा), तसेच इतर पक्षांच्या उमेदवारांबद्दल नागरिकांमध्ये नाराजीचा सूर दिसत असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहे. गेल्या काही वर्षांतील स्थानिक प्रश्नांची समाधानकारक सोडवणूक न झाल्यामुळे मतदारांमध्ये असंतोष असल्याचे बोलले जात आहे.

# मधुरत्न जैविक कुषीफार्म कान्हेरी येथे मध्यस्थीचे मार्गदर्शकांनी सेंद्रिय प्रक्रिया उद्योगाची पाहणी



▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :
मधुरत्न जैविक कुषी फार्म कान्हेरी सरप येथे विविध सेंद्रिय प्रकिया उद्योगाची पाहणी मध्यस्थी चे जेष्ठ मार्गदर्शक आदरणीय श्री.रमेश उर्फ नानासाहेब हिंगणकर, आदरणीय मा.श्री. बाळासाहेब फोकमारे अध्यक्ष मा.रमेशमामा टिकार अध्यक्ष व मध्यस्थी च्या विविध कार्यकारणी यांची उपस्थिती होती तसेच सर्व मान्वराचे कुषी भुषण मधुकरराव सरप,दिपक सरप, योगेश सरप यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले सर्व मान्यवरांनी मधुरत्न जैविक कुषी फार्म मध्ये सेंद्रिय प्रक्रिया उद्योगाची प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले. संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट अंतर्गत मध्यस्थी' वधू-वर सुचक मंडळ,आकोट'मध्यस्थी' विवाह 'मध्यस्थी' खालील मान्यवर यांची सदिच्छा भेट.श्री बाळासाहेब फोकमारे, श्री जयकृष्ण वाकोडे,श्री सुरेश ना.कराळे.,श्री नंदकिशोर हिंगणकर ,श्रीराममुर्ती वालसिंगे श्री महादेवराव सावरकर .श्री नागोरावजी वानखडे.श्री मधुकरराव पुंडकर .श्री गजानन हिंगणकर श्री विनायकराव कुकडे सर.श्री रामदासजी मंगळेश्री दिपक पाटील वानखडे श्री विजय पा. वानखडेश्री डी.ओ.म्हैसने.श्री शिरीष पोटेश्री अमोल बोरकर श्री अनिलभाऊ कोरप. श्री प्रदिप ओळंबे सर,श्री प्रदिप ओळंबे सर,श्री वाल्मीक भगत सर आदि उपस्थित होते.

# पातूर येथे भारतीय संविधान दिवस साजरा

▪पातूर,दि २७ (राजाराम देवकर) :
पातूर येथील साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण,पातूर आणि स्वामी विवेकानंद युवती बहु.मंडळ,पातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी स्वामी विवेकानंद सभागृह कान्होबा चौक,पातूर येथे ७६ वा भारतीय संविधान दिवस उत्सवात साजरा करण्यात आला. यावेळी मंडळाचे व प्रतिष्ठानाचे आणि युवती मंडळाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. यावेळी साने गुरुजी मंडळाचे संस्थापक युवाश्री विशाल राखोंडे यांनी भारतीय संविधान पुस्तिकेचे व उद्देशिकेच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली.त्यांनतर प्रतिष्ठानाचे अध्यक्ष तथा लोककलावंत सागर राखोंडे यांनी उपस्थित सर्वांना भारतीय संविधाना मधील उद्देशिकेचे सामूहिकरित्या वाचन करून उपस्थित सर्वांना संविधाना मधील उद्देशिकेची प्रत वाटप करण्यात आले त्यानंतर



दि.२६/११ मध्ये मुंबई येथे झालेल्या दहशतवादी अतिरेक्यांच्या भ्याड हल्लयात शहिद झालेल्या वीर जवानांना आणि निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली देण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे संचालन पल्लवी मांडवगणे तर आभार अँड.शुभांगी उमाळे यांनी मानले यावेळी मंडळाचे व प्रतिष्ठानाचे आणि युवती मंडळाचे पदाधिकारी व सदस्य गणेश देवकर, रवी कढोणे, श्याम उगले, प्रेयांश राखोंडे, पूनम तिडके, ज्योती राखोंडे, शिवानी कराळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# आयुष्यात यश प्राप्त करायचं असेल तर अभ्यासाला महत्व द्या : विनय वैराळे

▪बाळापुर,दि २७ (प्रतिनिधी) :
आज संविधान दिवस आहे भारताला संविधान भारतरत्न डा बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलं त्या बाबासाहेबानी शिक्षनाला वाघिणीच्या दुधाची उपमा दिली होती जो हे दुध पिणार तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही म्हणजे कुठल्याही क्षेत्रात अपयशी होणार नाही म्हणून तुम्हाला यशस्वी होयाच असेल तर अभ्यास करा असं महत्वाचे मार्गदर्शन दूरदर्शन (टीव्ही)वर गाजलेल्या महाभारत या प्रसिद्ध मालिकेचे संपादक विनय वैराळे यांनी जि प शाळा बोरगाव वैराळे येथे संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विध्यार्थी वर्गाला केले.ते पुढे म्हणाले की कुठलीही गोष्ट इम्पॉसिबल नाही इम्पॅसिबल या शब्दातच आय एम पॉसिबल हा शब्द येतो म्हणून मेहनत करा आणि मनाशी पक्की खुणगाठ बांधा की मी हे करू



शकतो तुम्ही ठरविले तर काहीच अशक्य नाही आज संविधान दिवस या संविधानाने देश चालतो ते संविधान वर्गाबाहेर बसून शाळा शिकणाऱ्या डा बाबासाहेब आंबेडकर नावाच्या विध्यार्थ्यांनी लिहिले आहे त्यामुळे शिक्षकानी शिकविले तो गृहपाठ नियमित करा खूप अभ्यास करा यश तुमच्या पायाशी लोटांगण घालेल असा महत्वाचा उपदेश यावेळी केला यावेळी गावचे सुपुत्र पण सध्या लंडन येथे स्थायिक झालेले ययाति वैराळे, सरपंच कल्पना विनायक वैराळे, उपसरपंच राजेश्वर वैराळे, शाळा समिती चे अध्यक्ष दिलीप इंगळे, डा अनिरुद्ध वेते, मंगेश वैराळे, सुनील गावंडे उपस्थित होते.

## दुकानदारास मारहाण

**अकोला** : बालाजी ज्यूस सेंटर, वर्धमान संकुल, अमानखा प्लॉट परिसरात जागेच्या वादातून दुकानदार व त्याच्या कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरोधात सिव्हिल लाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name
-------FROM-----
**ASHOKKUMAR CHANDAK**
-------TO---------
**ASHOK CHANDAK**
**PASSPORT NO J8892244**
**My Residential Address**
is - Flat No 203 Shri Sai Gajanan Residency Station Road Bhagwat Wadi Opp Vasant Desai Stadium Akola 444001.

# वसुंधरेचे खाद्य आहे गोमय गोमूत्र: प्रा विवेक बिडवई

## कानशिवणी येथील गोपालकृष्ण गोरक्षण संस्थेचा गोपाष्मी उत्सव संपन्न

▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी) :
ज्याप्रमाणे मानव,प्राणी यांना खाद्याची गरज आहे, अगदी त्याचप्रमाणे भूमातेचे खाद्य आहे, ते म्हणजे गोमय गोमूत्र! आणि म्हणून पंचगव्य हे कित्येक औषधांमध्ये सुध्दा वापरण्यात येते, असे अभ्यासपूर्ण व अनुभवयुक्त प्रतिपादन आदर्श गोसेवा व अनुसंधान केंद्राचे सचिव प्रा विवेक बिडवई यांनी केले.कानशिवणी येथील गोपालकृष्ण गोसेवा व अनुसंधान केंद्राच्या बहुउद्देशीय वार्षिकोत्सवाच्या कार्यक्रमात प्रा विवेक बिडवई हे मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर राजेश चितलांगे,देवकिसन भट्टड, विनायकराव शेळके, पशुधन विकास अधिकारी डॉ दीपक बोराळे, हभप भक्तराज महाराज काणशिवणी,हभप गणेश महाराज आजनी आदी मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी मान्यवरांनी समयोचित उद्बोधन करीत गोमातेची उपयुक्तता प्रतिपादित केली. प्रारंभी गोभक्त कु मीनलताई सोमानी अकोला यांच्या अकाली निधनाबद्दल तथा गोभक्त श्रीमती जमुनाबाई रामबिलास कोठारी यांच्या वार्धक्यामुळे निधन झाल्यामुळे त्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या नंतर कार्यक्रमाची मंगल सुरुवात गायिका सौ.स्नेहाताई अनिल सोनी यांनी गायलेल्या गणेश वंदनेने झाली. याप्रसंगी राजेश चितलांगे यांनी मुक्त संचार गोठाचे भूमिपूजन केले.विनायक शेळके यांच्या हस्ते श्री राधे राधे महाराज यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त स्मृतीशीलाचे अनावरण करण्यात आले. तथा संस्थेच्या कार्यालयाचे समर्पण जितेंद्र मोटवानी अकोला यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात गोरक्षण संस्थेला अनेक वर्षापासून उत्कृष्ट सेवा देणारे पशुवैद्यक डॉ योगेश



कथलकार,दहापेक्षा जास्त गोवंश सांभाळणारे डॉ केशव ठाकरे, साहेबराव ठाकरे, भारत चोटमल टाकळी व या दुष्काळी वर्षात गोरक्षण संस्थेला निशुल्क चारा देणाऱ्या वीस कास्तकारांचा सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक संस्थेचे सर्वसेवाधिकारी प्रकाश वाघमारे यांनी करून या गोरक्षण संस्थेची माहिती दिली.सेंट्रल बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी पानझाडे यांनी यावेळी कार्यक्रमाचे आभार मानले.या कार्यक्रमात प्रगती उद्योग समूहाचे राधेश्याम अग्रवाल,गोयल फायनान्सचे मनोज टीबडेवाल,दादासाहेब भुईभार,गिरीश पंड्या, संदीप बुब,अनिल सोनी, जयंतराव कुरेकर, महादेवराव कुलकर्णी,प्रभाकरराव देशमुख, राधाकिसन भट्टड उपस्थित होते.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन



**अकोला :** पवन सुनिल मैत्रे ( वय २५ वर्षे, रा. भारती प्लॉट, बाळापूर नाका, जुने शहर, अकोला) हा युवक दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ८ वाजता घरी कोणालाही न सांगता निघून गेला आहे.घरच्या लोकांनी व नातेवाईकांनी शोध घेतला असता तो मिळून आला नाही. उंची ५ फुट ४ इंच, डोळे काळे, केस काळे, रंग सावळा, बांधा सडपातळ, अंगात काळे शर्ट व काळे पॅन्ट, पायात काळ्या रंगाची स्लीपर चप्पल घातली आहे. ज्यांना या युवकाची माहिती मिळाली त्यांनी पोलीस स्टेशन, डाबकी रोड, अकोला येथे संपर्क साधावा. (दू. नं.०७२४-२४४५३४०) तपास अधिकारी एएसआय विजय गव्हाणकर मो. नं. ८३८००६८६६०

**वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) कार्यालय सिंधी कॅम्प, गुरुनानक शाळेजवळ अकोला**
**दूरध्वनी क्र. ०७२४/२४०२३५१,**
**ईमेल** rfoakola@gmail.com

सत्यमेव जयते

RANGE FOREST OFFICE
SINDHI CAMP, NEAR GURUNAN SCHOOL AKOLA
Phone no.0724/2402351
Email ID-rfoakola@gmail.com

**बी १ निविदा सुचना क्रमांक/१०२०/२०२५-२६ दिनांक २४/११/२०२५**

वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) अकोला वनविभाग अकोला यांचे वतीने खालील कामांसाठी बी-१ प्रपत्रातील बांधकाम विभागाचे योग्य त्या वर्गातील प्रजीबध्द कंत्राटदाराकडुन महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग शुध्दीपत्रक सीएटी /२०१७/प्र.क्र०८/इमा-२/मंत्रालय मुंबई दि २० मे २०२१ नमुद कार्यप्रणालीनुसार रु १०.०० लक्षाचे आतील कामाचे पातळीवर सिलबंद पॉकीटमध्ये अल्प कालावधीची निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची रक्कम जीएसटी वगळुन | बयाना रक्कम १ % (रु.) D.D./F.D.R. | काम करण्याची कालमर्यादा | कोऱ्या निविदा नमुन्याची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Repairs to DFO Bunglow at Akola | ६५६०००/- | ८०००/- | ९० दिवस | ५००.०० | खुला |

**निविदा संबधीत सुचना**
**तसेच शर्ती व अटी-**
१) अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बॅक किंवा शेडयुल बँक डि.डि./ऋ.ऊठ चे स्वरुपात अकोला शाखेवर देय असलेले वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) अकोला यांचे नावे जमा करावा लागेल..
२) कोरी निविदा प्रपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) अकोला यांचे कार्यालयात दिनांक २६/११/२०२५ सांय ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध राहतील. (शासकीय सुट्टी चे दिवस ३) निविदा सादर करण्याची अंतीम तारीख २८/११/२०२५ ला सां ५.०० वाजेपर्यत राहील. निविदेची प्रत 'वगळुन) टपालाने पाठविता येणार नाही.
४) निविदा दि ०५/१२/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) अकोला यांचे कार्यालयात उपस्थित निविदाधारक कंत्राटदार समोर उघडण्यात येईल.
५) निविदा संबंधी इतर अटी व शर्मी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) अकोला यांचे कार्यालयातील माहिती फलकावर पाहावयास मिळेल.
६) निविदेतील कामे रद्द करण्याचे अधिकार उपवनसंरक्षक (प्रा) अकोला यांना राहतील. कामांचा कार्यरंभ आदेश हा निधी उपलब्धतेवर अवलंबुन राहील.


**(व्हि.आर.थोरात)**
**वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा,.)**
**अकोला वनपरिक्षेत्र,अकोला.**

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/११६/२०२५

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मेला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक :** *पुरूषोत्तम **मधुकरराव** ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )

# महात्मा जोतीराव फुले



भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन.

महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता. त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले.

काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला.

अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

'सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली.

या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली.

समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की....

*विद्येविना मती गेली ।*
*मतिविना नीती गेली।*
*नितीविना गती गेली ।*
*गतिविना वित्त गेले ।*
*वित्ताविना शूद्र खचले ।*
*इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।*

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिका पदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापक पदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले.

महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही.

कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही.

महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कायार्ला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला.

त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद.

छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत.

समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्रयाची वास्तवता विशद केली आहे.

या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता.

अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे.

२८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# काँग्रेसचे आणखी एक विभाजन होईल का?

बिहारच्या निवडणुकीच्या निकालानंतर विरोधकांचा सुपडा साफ होईल अशी भविष्यवाणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी निवडणूक काळात केली होती. निकालानंतर काँग्रेस, राजद अशा महाआघाडीची दाणादाण उडाली त्यामुळे अमितभाईंचे भविष्य खरे ठरले.

निकालानंतर दिल्लीत भाजपाच्या मुख्यालयात पक्षाच्या कार्यकर्त्यांचा विजयी मेळावा झाला त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनीच काँग्रेसचे आणखी एक विभाजन होणार असल्याचे सुचित केले. पंतप्रधानच जेव्हा असे सांगतात तेव्हा त्यांच्याकडे काँग्रेसमधे फूट पडणार याची पक्की माहिती असावी. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर देशात झालेल्या विविध राज्यांतील विधानसभा निवडणुकांमधे काँग्रेस पक्षाचा पाठोपाठ दारूण पराभव झाला आहे.

**स्टेटलाईन**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

काँग्रेसच्या पराभवाची मालिका तशी २०१४ पासूनच सुरू झाली आहे. २०१४ मधे केंद्रात नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार स्थापन झाले तेव्हापासून काँग्रेसमुक्त भारत अशी घोषणा भाजपाने दिली होती. तरीही चार राज्यात काँग्रेसची सत्ता आली. नुकत्याच झालेल्या बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसचे अवघे सहा आमदार निवडून आले, काँग्रेसचा एवढा दारूण पराभव या राज्यात यापुर्वी कधी झाला नव्हता.

या निकालानंतर देशभरात काँग्रेस खचली आहे किंवा नैराश्यात आहे हे उघड आहे. पण काँग्रेस आणखी एका विभाजनाच्या मार्गावर आहे असे पंतप्रधानांनी सांगितल्यामुळे सर्वच विरोधी पक्षांना धक्का बसला आहे.

बिहार निकालानंतर भाजपाच्या विजयी मेळाव्यात पंतप्रधान काँग्रेसबद्दल बरेच बोलले. निवडणुकीच्या प्रचारातही ते काँग्रेस व राजदला झोडून काढत होतेच. ज्या पक्षाचे केवळ सहा आमदार निवडून आले आहेत, त्या पक्षाची भाजपाला अजून भिती का वाटावी हे समजत नाही.

काँग्रेस व राजदला बिहारच्या यंदाच्या निवडणुकीत अनपेक्षित मोठा पराभव पत्करावा लागला. कोणत्याही ओपिनिअन किंवा एक्झिटपोलमधे महाआघाडीचा एवढा दारूण परभव होईल किंवा एनडीएला २०० पेक्षा जास्त जागा मिळतील असे म्हटलेले नव्हते.

तेजस्वी यादव यांच्या सभांना लोकांची अफाट गर्दी लोटत होती, सर्वाधिक म्हणजे भाजपापेक्षा किती तरी जास्त मतदान हे राजदला झालेले आहे, तरीही या पक्षाला तीस जागाही मिळाल्या नाहीत याचे काय कारण असू शकते ? पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपाच्या दिल्लीतील मेळाव्यात म्हणाले, मुझे लगता है काँग्रेस मे एक और बडा विभाजन हो सकता है... पंतप्रधनांनी अशी भविष्यवाणी कशाच्या आधारावर केली?

२०१४, २०१९ आणि २०२४ अशा तीन सलग लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. २०२४ निवडणुकीत पक्षाचे शंभर खासदार निवडून आले म्हणून निदान राहुल गांधींना लोकसभेतील विरोधी पक्षनेते पद तरी मिळाले, त्यापुर्वी काँग्रेसला पन्नास जागा मिळवतानाही नाकी नऊ आले होते व विरोधी पक्षनेतेपदही मिळाले नव्हते. बिहारच्या निकालानंतर काँग्रेसचे भवितव्य काय अशी चर्चा पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. पंतप्रधानांच्या भविष्यवाणीने काँग्रेसचे विभाजन झाले तर कोण कोण नेते बाहेर पडतील असे अंदाज व्यक्त केले जात आहेत.

गांधी परिवाराच्या मक्तेदारीवरून काँग्रेसमधील जुणे जाणते अनेक नेते नाराज आहेत. मध्यंतरी पक्षात जी २३ ग्रुप स्थापन झाला होता. राहुल गांधी काँग्रेसला यश मिळवून देऊ शकत नाहीत अशी पक्षात अनेकांची खात्री पटली आहे. पण राहुल यांना पक्षात पर्याय कोण हे मात्र सांगितले जात नाही. सलमान खुर्शीद, शशि थरूर, कपिब सिबल, पी, चिदंबरम अशी अनेक नावे सांगता येईल की सध्याच्या नेतृत्वाविषयी समाधानी नाहीत. पण अखिल भारतीय पातळीवर पक्षाचे नेतृत्व करण्याची कुवत व धमक अन्य कुणातही नाही.

बिहार विधानसभेत भाजपाचे ८९ आमदार निवडून आले आहेत. काँग्रेसचे निवडून आलेले ६ आमदार तरी यापुढे पक्षात कायम राहतील याची तेथे शाश्वती नाही.

जी २३ मधे असलेले गुलाम नबी आजाद यांनी स्वतःचा वेगळा पक्ष स्थापन केला. कपिल सिबल हे सपाची मदत घेऊन राज्यसभेवर खासदार झाले. अशोक गेहलोट, आनंद शर्मा हे कुठे निर्णय प्रक्रीयेत नसतात. राहुल गांधीच्या भोवती जी चौकडी आहे, ती पक्षाच्या अन्य नेत्यांना त्यांच्यापर्यंत पोचू देत नाही. जनाधार नसलेल्या व संघटनात्मक अनुभव नसलेल्या निकटवर्तीयांना निवडणूक काळात महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या जातात, त्यामुळे पक्षाची नेमकी अवस्था काय आहे हे श्रेष्ठींपर्यंत पोचतच नाही.

युवक काँग्रेसच्या दिल्लीतील कार्यालयातील एका कर्मचाऱ्यावर बिहार निवडणुकीत प्रभारी म्हणून पक्षाने जबाबदारी सोपवली होती त्याचा अन्य नेत्यांच्या मानसिकतेवर परिणाम होणारच. मध्य प्रदेशात पंचमढी येथे पक्षाचे नुकतेच शिबिर झाले, त्या शिबिराला राहुल गांधी यांना पोचायला दहा मिनिटे उशीर झाला म्हणून शिबिर प्रमुखाने दहा जोर काढण्याची त्यांना शिक्षा सुनावली. पक्षाच्या भूमिकेच्या विरोधात जाऊन काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते मोदी सरकारच्या ऑपरेशन सिंदुरची माहिती आंतरराष्ट्रीय पातळीवर समजावून सांगण्यासाठी शिष्टमंडळात सहभागी झाले होते, त्यानेही पक्षात सामंजस्य व एकवाक्यता नसल्याचे चित्र दिसले.

राजस्थानात अशोक गेहलोट व सचिन पायलट यांच्यात शीत संघर्ष कित्येक वर्षे चालला आहे, त्याने पक्षाला सत्ता गमवावी लागली , आता दोन्ही नेते हात चोळत बसले आहेत. भूपेश बघेल यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सत्ता गमावली तेव्हा पक्ष संघटनेकडे लक्ष द्यायला खूप उशीर झाला हे लक्षात आले. मध्य प्रदेशात कमलनाथ हे मोठे नेते पक्षाशी निष्ठावान आहे. पण मध्य प्रदेशात भाजपाने पाया भक्कम केला आहे. पक्ष संघटनेकडे हायकमांडला लक्ष द्यायला वेळ नाही, त्यातूनच एकापाठोपाठ एक राज्यात काँग्रेसचा आलेख घसरत आहे. काँग्रेसमधील खदखद भाजपाने हेरली आहे. काँग्रेसचे अनेक दिग्गज गेल्या दहा वर्षात भाजपाच्या वळचणीला गेले. भाजपानेही त्यांना सत्तेत मान सन्मानाची पदे दिली. पण त्या सर्वांना आपल्या धाकात व शिस्तित ठेवले. भाजपाची विचारधारा पटली म्हणून काँग्रेसमधून कोणीही भाजपात गेलेले नाही, एक म्हणजे सत्तेच्या लोभाने गेले व दुसरे म्हणजे नोटीसा व चौकशीतून सुटका व्हावी म्हणून त्यांनी कमळ हाती धरले. राज्या- राज्यात पराभव झाल्यावर पक्ष संघटना बांधणीसाठी कुठे प्रयत्न होताना दिसत नाही.

यापुर्वीही काँग्रेस पक्षात फूट पडली होती. १९६९ मधे पक्षात मोठी फूट पडली. सिंडिकेट व इंडिकेट काँग्रेस असे विभाजन झाले. काँग्रेस (आर ) व काँग्रेस (आय) अशा दोन बॅनर्स खाली दोन पक्ष बरेच काळ वावरत होते. नंतर शरद पवार, ममता बॅनर्जी, असे अनेक बडे नेते काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केले. पण बाहेर पडलेल्या नेत्यांना सन्मानाने पक्षात परत आणण्याचे काम झाले नाही.

केंद्रात गेल्या अकरा वषार्पासून काँग्रेसची सत्ता नाही पण पक्ष संघटना बांधणीसाठी पक्षाचा कोणी नेते देशभर फिरतोय असे दिसत नाही. काँग्रेसची सर्व मदार आजही गांधी परिवारावर आहे.

काँग्रेसच्या भविष्याविषयी बोलताना शरद पवार यांनी म्हटले आहे की, राजकारणात चढ- उतार असले तरी काँग्रेस पक्ष कधिही संपणार नाही. महाराष्ट्रात काँग्रेसचा १९५७ साली पराभव झाला होता. संयुक्त महाराष्ट्र समितीचा विजय झाला होता. तेव्हाही महाराष्ट्रात काँग्रेस संपली असे म्हटले गेले. पण पक्ष असे संपत नसतात.

# वित्तीय भांडवलशाही : नवे साम्राज्य, नवा गुलाम

आजच्या काळात जगावर राज्य करणारे साम्राज्य शस्त्रांनी नाही, तर पैशाने चालते. हीच आहे वित्तीय भांडवलशाही जिथे भांडवल, म्हणजे पैसा, बाजार आणि बँकिंग यंत्रणा मिळून सत्तेचे खरे केंद्र बनले आहे.

पूर्वी साम्राज्ये तोफा, तलवारी आणि सैन्याच्या जोरावर उभी राहत. आज ती संगणकाच्या स्क्रीनवर, शेअर बाजाराच्या चढउतारात आणि बँकांच्या निर्णयांत उभी राहतात. एका क्लिकवर अब्जावधी डॉलर एका देशातून दुसऱ्या देशात हलवले जातात आणि त्या हालचालीवर संपूर्ण राष्ट्रांचे भविष्य अवलंबून असते.

ही व्यवस्था कामगार, शेतकरी आणि सामान्य जनतेच्या कष्टावर उभी आहे, पण नफा मात्र काही हातात केंद्रित आहे. कॉर्पोरेट्स, गुंतवणूक बँका आणि वित्तीय संस्थांनी जगाचा नकाशाच बदलून टाकला आहे.



**प्रविण बागडे**
**नागपूर.**
**9923620919**

आज बहुतेक देशांचा अर्थसंकल्प, विकासनीती आणि सामाजिक धोरणेही आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांच्या अटींवर ठरतात. विकासाच्या नावाखाली देश कर्जाच्या ओझ्याखाली जातात आणि त्यांच्या लोकशाहीवर बाजार अधिराज्य गाजवतो.

शेअर बाजारातील घसरण म्हणजे सर्वसामान्य माणसाचे भविष्य धोक्यात. चलनवाढ वाढली की गरिबांचा स्वप्नांचा संसार मोडतो, पण काही गुंतवणूकदार मात्र या अस्थिरतेतूनही नफा कमावतात. हीच तर भांडवलशाहीची निर्दयी गणिती पद्धत आहे.

आज वित्तीय साम्राज्य केवळ बँकांपुरते मर्यादित नाही. डिजिटल पेमेंट्स, क्रिप्टोकरन्सी, फिनटेक कंपन्या आणि ई-कॉमर्स यांनी नवीन आर्थिक गुलामी निर्माण केली आहे. डेटा म्हणजेच नवीन सोनं झालं आहे. मोठ्या कंपन्या तुमच्या खरेदीच्या सवयी, आवडीनिवडी आणि स्वप्नांचाही व्यापार करतात. ग्राहक आता ग्राहक राहिला नाही तर तो एक डेटा प्रॉडक्ट बनला आहे.

भारतातील आर्थिक सुधारणांनंतर (१९९१ पासून) वित्तीय भांडवलशाहीने आपले पाय खोलवर रोवले. खासगीकरण, परकीय गुंतवणूक आणि कॉर्पोरेट अनुदान यांच्या जोरावर संपत्तीची मोजकी केंद्रे तयार झाली. एकीकडे शेअर बाजार तेजीत, तर दुसरीकडे शेतकरी आत्महत्या ही विषमता वित्तीय भांडवलशाहीची सर्वात क्रूर ओळख आहे.

राजकीय पक्षांनाही निधी देणारे हेच कॉर्पोरेट घराणे. त्यामुळे लोकशाहीचे निर्णय ह्यजनतेसाठी नव्हे तर गुंतवणूकदारांसाठी घेतले जातात. माध्यमांपासून धोरणांपर्यंत सर्वत्र पैशाची छाप दिसते. परिणामतः जनतेचे शासन कॉर्पोरेट लोकशाही बनले आहे. वित्तीय भांडवलशाहीविरोधात संघर्ष म्हणजे फक्त आर्थिक नव्हे तर सांस्कृतिक आणि वैचारिक लढा आहे.

स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत करणे, सहकार, शेती, हस्तकला आणि नैतिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे, वित्तीय शिक्षण आणि पारदर्शक बँकिंग ही काही प्राथमिक पावले आहेत. परंतु खरी गरज आहे, मानवकेंद्री अर्थव्यवस्थेची. पैसा साधन राहावा, उद्देश नव्हे.

आज जगात सर्वात मोठा धोका अणुबॉम्ब नाही, तर पैशाच्या हातात आलेली सत्ता आहे. वित्तीय भांडवलशाहीने माणसाला ग्राहक बनवले, समाजाला बाजार आणि राष्ट्रांना कंपन्यांचे शेअर बनवले. ही साखळी तोडायची असेल, तर विचार बदलावा लागेल. माणूस पैशासाठी नव्हे, पैसा माणसासाठी या तत्त्वाकडे परत जावं लागेल.

■ ■ ■




## ५० उंदीर खाऊन महिलेने कमी केले १४ किलो वजन

**एका चिनी महिलेने ५० उंदीर खाऊन ३० दिवसात १४ किलो वजन कमी केले. यासाठी तिला कांस्यपदक आणि रोख बक्षीस मिळाले.**



२५ वर्षीय झाओ तिझू यांनी कोणत्याही मदतीशिवाय जंगलात जगण्याच्या आव्हानात भाग घेतला. हे आव्हान १ ऑक्टोबर रोजी पूर्व चीनच्या झेजियांग प्रांतातील एका बेटावर सुरू झाले. जो सर्वात जास्त काळ जगला तो विजेता ठरला.

# घुसखोरांनी घेतला एसआयआरचा धसका!

**उत्तरार्ध**

**(कालच्या अंकावरून पुढे)**

---------------

मुख्य निवडणुक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या आकडेवारी नुसार पश्चिम बंगालमधील मतदारांची एकूण संख्या (२८ ऑक्टोबर २०२५ रोजी ) ७ कोटी ६६ लाख ३७५२९ इतकी आहे. प्रत्येक पोलिंग स्टेशन मधील मतदारांची सरासरी संख्या ९५० इतकी आहे.

विशेष सखोल फेरतपासणीची (एसआयआर) प्रक्रिया मार्च २०२६ मध्ये पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

या अगोदर २००२ साली ही मोहीम पश्चिम बंगाल मध्ये राबविण्यात आली होती. २००२ ची मतदार यादी सध्याच्या विशेष सखोल फेरतपासणीसाठी आधार म्हणून वापरली जात आहे. सध्या पश्चिम बंगाल मध्ये मुस्लिम समाजाची संख्या, एकूण लोकसंख्येच्या २७ ते ३० टक्के इतकी आहे.

पुर्वीच्या पूर्व पाकिस्तान मधून आणि नंतर बांगलादेश मधून सातत्याने पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या बेकायदेशीर घुसखोरीमुळे, पश्चिम बंगाल मधील, मुस्लिम समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून आले आहे.

या घुसखोरांनी आधार कार्ड, रेशनकार्ड,इलेक्शन कार्ड ही अत्यावश्यक कागदपत्रे विनासायास मिळवली असून, ही कागदपत्रे, त्यांना मिळवून देण्यात, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा हात असल्याची गोष्ट लपून राहिलेली नाही.या घुसखोरांच्या भक्कम पाठिंब्याच्या जोरावरच २०११ पासूनच्या निरनिराळ्या निवडणुका, तृणमूल काँग्रेसने सहजपणे जिंकल्या आहेत.

पश्चिम बंगाल सरकारच्या निरनिराळ्या कल्याणकारी योजनांचा लाभ, हे घुसखोर, बिनदिक्कतपणे घेत आहेत.विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेत आपण पकडले जाऊ, या भीतीने काही घुसखोर बांगलादेशमध्ये परतण्याची घाई करत आहेत. त्यांच्यामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेमुळे आपल्या व्होट बँकेला मोठ्या प्रमाणात तडा जाईल या भीतीने,ममता बॅनर्जी याही घाबरलेल्या आहेत.

■ **अभय गोखले**

■ ■ ■

## अयोध्येत धर्मध्वज स्थापना : सनातन संस्कृतीचा गौरवशाली क्षण

**वाचक लिहितात**

मार्गशीर्ष शुक्ल पंचमी अर्थातच, २५ नोव्हेंबर २०२५ या पवित्र दिवशी प्रभू श्रीरामांच्या जन्मभूमी अयोध्येतील मंदिराच्या कळसावर धर्मध्वजाची स्थापना झाली. सनातन धर्मामध्ये धर्मध्वजाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ध्वज हे राष्ट्राच्या अस्तित्वाचे आणि संस्कृतीच्या अभिमानाचे सन्मानचिन्ह आहे.

५०० वर्षांच्या संघषार्नंतर धर्मध्वजाची स्थापना होणे हा प्रत्येक भारतीयांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. प्रभू श्रीरामांच्या सैन्यध्वजाप्रमाणे दैवी कोविदार वृक्ष, सूर्यवंशी रघुवंशाचे प्रतीक असलेला तेजोमय सूर्य आणि ब्रह्मांडाचे बीजाक्षर ह्यॐ यांची नक्षी असलेला हा ध्वज श्रीराममंदिराच्या कळसावर स्थापन होणे, हे भारतीय संस्कृतीचे पुनरुत्थान आहे. यातून राष्ट्रीयत्वाची भावना निश्चितच अधिक दृढ होईल. तसेच आता प्रत्येकाच्या मनात रामराज्याची स्थापना लवकरच होईल अशी आशा निर्माण झाली आहे. त्याकरिता आता आपल्या प्रत्येकाची नैतिक, सामाजिक आणि राष्ट्राप्रतीची जबाबदारी वाढलेली आहे.

रामराज्यात जसे सर्वांना समान न्याय मिळत होता, महिला सुरक्षित होत्या आणि प्रजेला शिस्त, नैतिकता व कर्तव्यपालनाचे भान होते, तसे आदर्श राज्य घडण्यासाठी आज प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकानेही वैयक्तिक स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आपल्या अंतरंगात साधनेचे बीज रोवून प्रभू श्रीरामांचे आदर्श गुण आचरणात आणणे, हा खऱ्या अर्थाने सनातन राष्ट्राचा शंखनाद ठरेल.

■ **सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.**

## मतदारांना मुर्ख बनवण्याचे धंदे

राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होऊ घातले आहे. प्रचार शिगेला पोहचला असून, राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच इतर मंत्री, आमदार, पदाधिकारी झंझावाती प्रचारात गुंतल्याचे दिसून येत आहे. राज्यात भाजपा, शिंदेसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस हे एकत्रित सत्तेत असूनही या निवडणुकीत मात्र अनेक ठिकाणी एकमेकांच्या विरोधात उमेदवार दिले असून, एकमेकांचे कपडे फाडण्याचे धंदे सुरू आहेत. काल परवाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विदर्भात येवून गेले. लाडकी बहिण योजना मी सुरू केली, त्यामुळे लाडक्या बहिणी आमच्याच पक्षाकडे लक्ष देतील, असा दावा त्यांनी केला. त्यावर, मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला असून, लाडकी बहिण योजना कोणा एकाची नसून, महायुती सरकारने सुरू केल्याचे सांगितले.

नगरपालिका, पंचायतीसारख्या लहान निवडणुकांमध्ये एकमेकांच्या विरोधात लढायचे, एकमेकाचा भ्रष्टाचार बाहेर काढायचा, पोलखोल करायची आणि तिकडे मात्र गळ्यात हात घालून फिरायचे, सायंकाळचे मित्र व्हायचे, हे सगळे मतदारांनी ओळखायला हवे. यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे, हे ध्यानात घ्यावे. आंधळेपणाने मतदान करू नये.

■ **विकास गडपायले, नागपूर.**

# डाळीमध्ये हिंग का घालतात?





प्रत्येक घरात भाजी-चपाती असो वा नसो पण डाळभात तर असतोच असतो. महाराष्ट्रात प्रत्येकाच्या घरात डाळभाताशिवाय जेवण हे अपूर्णच असतं. इतका तो आवडीने खाल्ला जातो. पण प्रत्येकाच्या घरात डाळ बनवण्याची पद्धत वेगळी असते. डाळ अनेक पद्धतीने बनवली जाते. काहींच्या घरात की काहीशी गोडपद्धतीने बनवली जाते तर काहींच्या घरात ती मिरची-कडीपत्ताची फोडणी देऊन तडकावाली डाळ खाल्ली जाते. डाळ कोणतीही शिजवली तरी देखील त्यात एक पदार्थ वापरलाच जातो.

डाळीचेही अनेक प्रकार असतात. जसे की तुर, मूग, कवचयुक्त मूग, उडीद आणि चना. पण डाळ कोणतीही शिजवली तरी देखील त्यात एक पदार्थ वापरलाच जातो. त्याच्याशिवाय डाळीची चव वाढत नाही. हा मसाल्याचा पदार्थ म्हणजे हिंग. हिंग हा एक नैसर्गिक मसाला आहे जो फेरुला नावाच्या वनस्पतीच्या मुळापासून निघणाऱ्या द्रवापासून बनवला जातो. हिंग हा डाळ आणि भाज्यांची चव वाढवतो. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की डाळीमध्ये हिंग घालणे आवश्यकच का असते?

तर त्यामागील एक कारण म्हणजे डाळीची चव वाढते आणि दुसरं कारण म्हणजे त्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे, जे फार कमी लोकांना माहिती आहे.

**हिंग कसा तयार होतो?**

हिंग वनस्पती प्रामुख्याने इराण, अफगाणिस्तान आणि तुर्कमेनिस्तान सारख्या शुष्क प्रदेशात आढळतो आणि तो प्रामुख्याने शेती उत्पादन म्हणून भारतात आयात केला जातो. हिंगाच्या मुळापासून पहिल्यांदा कापणी केली जाते तेव्हा कापलेल्या भागातून दुधाळ रस (राळ) बाहेर पडतो. हा द्रव हळूहळू जाड होतो आणि घट्ट होतो, ज्यामुळे कच्चा हिंग तयार होतो.

काही आठवड्यांनंतर, राळ सुकून खडबडीत, तपकिरी किंवा लालसर-पिवळ्या रंगात बदलते, जे खरे हिंग म्हटले जाते.

**डाळीमध्ये हिंग घालण्याचे वैज्ञानिक कारण**

डाळींमध्ये प्रामुख्याने सेल्युलोज, हेमिसेल्युलोज आणि पेक्टिन असते. सेल्युलोज हे एक जटिल कार्बोहायड्रेट आहे जे मानवी पचनसंस्थेमध्ये सेल्युलेज या एन्झाइमच्या कमतरतेमुळे थेट खंडित होऊ शकत नाही. यामुळे, काही डाळी पचल्याशिवाय आतड्यांमध्ये पोहोचतात, जिथे ते गॅस निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाद्वारे आंबवले जातात. यामुळे गॅस, पोट फुगणे आणि पोटात जडपणा जाणवू शकतो.

**पोटाला आराम मिळतो**

पण जेव्हा तुम्ही डाळीमध्ये हिंग घालता तेव्हा हिंगमधील वाष्पशील सल्फर संयुगे आतड्यांतील सूक्ष्मजीव प्रक्रिया संतुलित करतात, ज्यामुळे वायू तयार होण्यास प्रतिबंध होतो. हिंगमधील अँटीस्पास्मोडिक संयुगे आतड्यांतील स्नायूंना आराम देतात, ज्यामुळे पोटफुगी होणे किंवा गॅस होणे टाळले जाते.

त्यामुळे एखादी डाळ किंवा भाजी तुम्हाला पचायला थोडी जड वाटत असेल तर त्यात फोडणीला नक्कीच चिमूटभर हिंग टाका.त्यामुळे भाजीची चव तर वाढतेच पण सोबतच पोटाला त्रास होत नाही.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### मतदारांचे मनोगत ..!

**निवडणूकीच्या काळात**
**कार्यकर्ते येती घरी**
**चहापाण्यासाठी ठेवून घ्या**
**भौ म्हणती थोडे तरी ..**

**भाऊ, आम्ही तुमचेच**
**म्हणून कितीही जोडले हात**
**त्यांना वाटे मत द्यायचे नाय**
**म्हणून असे म्हणतात..**

**सांगा भौ आता**
**आम्ही करावं तरी काय ?**
**मत विकण्याचा कलंक**
**आमच्या माथी लागतो**
**की नाय?**

# आधुनिक शतकातही महात्मा फुलेंचे विचार आदर्शवत

सामाजिक न्याय, समता आणि बंधुत्वा या मूल्यत्रयीवर आधारित नव समाज निर्मिती हे महात्मा फुले यांच्या जीवित कार्याचे एकमेव परंतु सर्वंकष उद्दिष्ट होते. यासाठी सर्व हयात जनसामान्यांच्या कल्याणासाठी उद्धारासाठी महात्मा फुले यांनी अर्पित केली. डॉ. जनार्दन वाघमारे यांनी जोतिरावांना क्रुसेडर म्हटले आहे. ज्या व्यक्तीच्या जीवनात मिशन आणि रिबेलियन (बंडखोरी) या दोन्ही गोष्टींचे गुणधर्म एकवटतात ती क्रुसिडर बनते. महात्मा फुले हे मार्टिन ल्युथर प्रमाणे धार्मिक व सामाजिक क्रुसेडर होते. अन्याय आणि विषमतेविरुद्ध त्यांनी लढा पुकारला होता आणि त्याचबरोबर स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या उदात्त तत्त्वावर त्यांनी सामाजिक पुनर्रचनेचे कार्य हाती घेतले होते. दीडशे वर्षानंतर सुद्धा महात्मा फुलेंच्या विचारांची गरज आम्हाला का वाटते?

याचा विचार करता आजची सामाजिक परिस्थिती आणि सामाजिक मूल्य यांना तडा देण्याचे काम सुरू आहे. अशा काळात महात्मा फुले यांचे विचार प्रेरणादायी आणि मार्गदर्शक वाटतात त्यांच्या १३५ व्या स्मृतीदिनाच्या निमित्ताने महात्मा फुले यांचा काळ आज का उगळायचा आधुनिक शतकात या महामानवाच्या विचारांची आणि कार्याची गरज का याविषयी हे मत.

-----------------

महान पुरुषांचे विचार प्रेरणादायी आणि भावी वाटचालीसाठी प्रेरक असतात. क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची १३५ वा स्मृतीदिन आपण साजरा करणार. अनेक युगप्रवर्तक कार्य करून समाजाला अनेक बाबतीत दिशा देऊन हा महामानव २८ नोव्हेंबर १८९० रोजी अनंदात विलीन झाला. त्यांची श्रद्धा होती अशा विश्वनिर्मिकाच्या शोधात ते निघून गेले.

आजच्या टेक्नोसॅव्ही आणि आधुनिक युगात दीडशे वर्षांपूर्वी काहीतरी काम केलेल्या या व्यक्तीला इतकं महत्त्व का द्यायचं? त्यांच्या असण्या नसण्याची इतकी मीमांसा का करायची? लोक येतात कार्य करतात अन् जातात तेव्हा महात्मा फुले यांचे विचार, शिकवण आणि कायार्ची आजची उद्याची गरज महत्व यावर इतकी चिंताचिंतन का?

म्हणून आजच्या आमच्या पिढीसमोर इतर अनेकानेक अडचणी आव्हाने असताना फुल्यांचा इतिहासजमा झालेला काळ उगळायचाचा? या महामानवाच्या कार्याची दखल मीमांसा करतानाच आधुनिक शतकात या महामानवाच्या विचारांची कायार्ची गरज काय? याचा जर विचार केला तर बदलत्या परिस्थितीनुसार मार्गदर्शकाच्या भूमिकेत महात्मा फुले यांचे विचार आजही कार्यप्रवण वाटतात.

भविष्याची दिशा आणि वाटचाल गतकाळात शोधावी लागते. काल काय झालं किंवा काय नाही झालं हेच उद्या कसं आणि कुठे जायचं आहे हे निश्चित करतं म्हणून तर इतिहासाचं अध्ययन करायचं असतं. त्या त्या काळातल्या लढवय्याचं शौर्य, महामानवांचे विचार ,सुधारकांचे कार्य आत्मसात करायचं असतं त्यातच कुठेतरी भविष्याची पाऊलवाट सापडते.

आजची आणि येणारी पिढी कोण महात्मा फुले? कुठले? काय केले त्यांनी असे प्रश्न विचारू नये किंवा महात्मा फुले यांचे कार्य पुस्तकातल्या पानात बंदिस्त न होता येणाऱ्या पिढ्यांच्या कृतीत दिसावं त्यासाठी त्यांच्या कायार्चा आढावा घेणं वेळोवेळी अत्यावश्यक ठरतं.

अनेक रूढी परंपरांवर त्यांनी हल्ला चढवल्यामुळे अनेकांच्या पोटात आजही शुळ उठतो. महात्मा फुल्यांना चूक किंवा दुर्लक्षित करण्याची प्रवृत्ती आजही काही सनातनी आस्था असणाऱ्या लोकांमध्ये आहे. तेव्हा फुल्यांच्या कार्यावर वेळोवेळी लिखाण करणं क्रमप्राप्त ठरतं. त्यांच्या कार्याचे विचारांचे पाईक होऊन त्यांच्या कार्याची मशाल पुढच्या पिढीच्या हवाली करताना आपली ही पिढी प्रकाश घेत वाटा शोधू शकेल हे महत्त्वाचे.

### कोण हे महात्मा फुले?

स्त्री शिक्षणाचा प्रणेता, दलितांच्या उत्थानाचा उद्गाता आणि शेतकऱ्यांसाठी शेतीचं तत्वज्ञान मांडणारा पहिला हाडाचा कृषीतज्ञ माणूस म्हणजे महात्मा फुले. एकाच वेळी अनेक क्षेत्रात काम करून प्रस्थापित मूल्यांची परंपरांची चिकित्सा करत न पटणाऱ्या रुढींना नाकारणारा सत्याचा अखंड शोध घेणारा समाज प्रवर्तक विचारवंत म्हणजे महात्मा फुले.

प्रस्थापित मूल्यांना आणि पुरोहित शाहीनं निर्माण केलेल्या पोथीनिष्ठ समाज रचनेला सर्वप्रथम सुरुंग लावून उध्वस्त करणारा बुलंद माणूस म्हणजे महात्मा फुले. सत्यमेव जयते हे त्यांचे नित्य व्यवहाराचे ब्रीद होते ते म्हणजे महात्मा फुले. हेच ब्रीद पुढे भारताचं ब्रीदवाक्य झालं.

### फुल्यांना का स्मरावं?

समाजाची सूत्र पुढील पिढीच्या हवाली करताना गतकाळाचा इतिहास वैभव, घटना, कार्य, व्यक्ती या येणाऱ्या पिढीला सांगणं आणि त्यांची त्या पिढीच्या शब्दात मांडणी करणे त्यांना व्हिजन देणे हेच मागच्या पिढीचं कर्तव्य ठरतं. यातूनच नवी पिढी आपापल्या वाटा शोधून घेते.

इतिहासाच्या पाऊलखुणावरच नवी पिढी आपली नवी वाट शोधते. फुले देखील कधीतरी तत्कालीन नव्या पिढीचे प्रतिनिधी होते त्यांनीही इतिहासाचा अभ्यास करून आपली स्वतःची नवी वहिवाट शोधली म्हणूनच कदाचित छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी त्यांचा इतिहास त्यांच्या कार्यावर पोवाडा रचावा असं त्यांना वाटलं.

शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यास त्यांनी सुरुवात केली. शिवाजी महाराजांचं कार्य नव्या पिढीला कळावं त्यांनी त्यातून बोध घ्यावा हाच फुल्यांचा त्यामागील हेतू होता.

अस्पृश्यांसाठी काम, पहिली मुलींची शाळा, पुस्तक लेखन व प्रकाशन, उत्कृष्ट बांधकाम व्यावसायिक ते अनेक उद्योगांची आदर्श उभारणी अशा अनेक कार्यांच्या प्रेरणातून त्यांना दृष्टिकोन व्यवहारवाद अन् सत्याची त्याची शोध घेण्याची, सत्य मांडण्याची, सत्य स्वीकारण्याची वृत्ती दिसून येते.

आज जातीच्या बेड्यात अडकवलेल्या सर्व महामानवांना त्यातून मुक्त करत त्यांचं कार्य अखिल समाजासाठी प्रेरक मार्गदर्शक कसं होतं हे आमच्या पिढीला कळावं त्यासाठी फुल्यांच्या कार्याचा



मोहन माळी
उपमुख्याध्यापक
मातोश्री सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यामंदिर, द्वारका, नाशिक.

आढावा घेणं आवश्यक ठरतं.

महात्मा फुले या युगप्रवर्तक महामानवाची समाजांन केवळ प्रतिमा स्वीकारली आणि विचार निव्वळ भाषणापूक्षते ठेवले. आजही या महामानवाच्या आपण प्रतिकापुरतच मर्यादित करतो आहोत. त्यांचे विचार कार्य वाचण्याची त्यावर चर्चा करण्याची त्यांचे विचार आत्मसात करण्याची आजच्या काळाची गरज आहे.

जो समाज आपला इतिहास विसरतो त्याकडे दुर्लक्ष करतो तो नवा इतिहास निर्माण करू शकत नाही. आज आपण आपल्या या महामानवाला जर केवळ प्रतिमांत बंदिस्त केलं तर येणाऱ्या पिढ्यांसाठी ते प्रतिमापुरतेही उरणार नाहीत.

### महात्मा फुले यांचे महत्व काय? यावर काही लेखकांचं मत...

माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत म्हणतात महात्मा फुले सर्व अथार्ने समाजाचे नेते होते. नेतृत्वाच्या अंगी लागणारे सर्व गुण त्यांच्यात होते. सर्वांगीण समाज क्रांतीचे उज्वल ध्येय ते साकार करण्याकरता अविरत परिश्रम पडेल तो त्याग आणि कष्ट सोसण्याची तयारी, आघाडीवर राहून सर्व धोक्यांना सर्वप्रथम सामोरे जाण्याची धैर्यशील वृत्ती कृती आणि वाणीमध्ये अजोड मेळ सत्याची कास असत्याची अपप्रवृत्तीची चीड, बाणेदार स्वभाव शुद्ध चारित्र, स्वतंत्र प्रज्ञा आणि विशाल हृदय या गुणसमुच्चयाने त्यांचे जात्याच देखणे व्यक्तिमत्व तेजस्वी झाले होते.

त्यांनी हाताळलेल्या सर्व समस्या वंचित, दलित पीडित बहुजन समाजाच्या दुःखाची मूलगामी कारणे होती. समाज चौकटीवरच प्रार करून ती मोडून टाकून नवसमाज निर्मितीचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले होते. हजारो वर्ष जे नियम ज्या श्रद्धा परंपरा आणि रितीरिवाज समाजाने धार्मिक भावनेने तथाकथित परमेश्वरी आदेशानुसार आणि धर्मग्रंथाच्या आधारानुसार जोपासल्या होत्या त्यांच्यावर आघात करून अज्ञानी समाजाला जागृत करायचे आणि त्यांनी मानेवर घट्ट पकडून ठेवलेले जू फेकून द्यायला त्यांना प्रवृत्त करायचे हा त्याकाळी समाजद्रोहच होता.

स्वतःच्या स्वार्थाकरिता ज्यांनी बहुजनांच्या मानेवर जे जू ठेवले त्यांचा तर कडाडुन विरोध होणारच परंतु ज्यांनी यातून सुटका करायची त्या पिडित समाजाचाही त्याला प्रखर असहकार, मानसिक गुलामगिरी ही सर्व गुलामगिरीत भीषण कारणही प्रवृत्ती होऊन बसते.

ज्येष्ठ कादंबरीकार भालचंद्र नेमाडे म्हणतात, हा माणूस तत्कालीन इंग्रजी शास्त्राप्रमाणे केवळ लिहिणारा वाचणारा नसून सर्वस्वी नव्या प्रकारच्या जीव घेण्या चळवळीसाठी पायपीट करणारा, नाना तर्हेच्या माणसांमध्ये मिसळणारा, दुष्काळी कामे हाती घेणारा त्या काळातल्या बुरसटलेल्या लोकांकडून एक-दोन आण्यांपासून वर्गण्या गोळा करून त्यांचा चोख हिशोब ठेवून लोकोत्तर व लोकांत अप्रिय अशी स्त्री व शूद्र यांच्या शिक्षणाची कामे करणारा, स्वतः पुस्तके लिहून छापणारा, शूद्रास न्याय मिळवून देण्याकरता किंवा शूद्रांच्या हुशार मुलांपैकी गरिबांची मुले फुकट शिक्षण घेण्याकरिता अर्ज करून खेटे घालून कामे यशस्वी करून घेणाऱ्या अशा प्रकारचा हा माणूस असल्यामुळे त्यांच्या लेखनात पंडिती कमकुवतपणा नाही.

जोतिबा फुले यांनी पहिल्यांदाच मराठी गद्यात श्रमिकांची व शूद्रांची भाषा उमटवली आहे. खेड्यापाड्यातील लोकांचे वाक्प्रचार म्हणी उच्चारनुसार लेखन इत्यादी गोष्टी त्यांच्या लेखनात आढळतात.

महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्व असलेले पु. ल. देशपांडे म्हणतात, ज्या दुर्दैवी ब्राह्मण विधवांना कधी फूस लावून कधी जबरदस्तीने त्यांच्या शरीराचा उपभोग घेऊन केरेपोताऱ्यासारखे फेकून दिलेले होते, त्यांच्यावर महात्मा फुले नुसत्याच विलापिका लिहित बसले नाही तर त्या अभागी स्त्रियांची सावित्रीबाई कडून बाळंतपणे केली.

एवढेच नव्हे तर अशी बाळंतपणे केली जातील अशी पाटी स्वतःच्या घराबाहेर लावली. त्या माऊलीची सुटका करणाऱ्या सावित्रीबाई फुलेंचे कार्य अधिक जोखमीचे होते, कारण त्यांच्या या कार्याचा विरोध करून त्यांचे जीवन असह्य करणारे कोणी परकीय राज्यकर्ते नव्हते तर ते धर्मांध स्वकीय होते.

महात्मा फुलेंनी स्वतःचा हौद अस्पृशांकरता खुला करून महार मांग यांच्या मुलांसाठी शाळा स्थापन करून जातीभेद विरोधी मोहिमेला सुरुवात केली.

स्वतः व पत्नीला सोबत घेऊन सूत्रांसाठी शिक्षकाचे कार्य केलं त्यांच्या अनुयायांनी मात्र नेमकी त्यांच्या याच कृतीला बगल दिली. बोलक्या सुधारकांची भूमिका घेतली आजही फुल्यांच्या नावाचा जप सोयीनुसार करणाऱ्या मंडळींमध्ये जातीय भेद मानणारेच अनेक आहेत असे खेदानं म्हणावंसं वाटतं.

सामाजिक समतेचं फुल्यांच स्वप्न एव्हाना साकार व्हायला हवं होतं पण ते साकार होण्याऐवजी दिवसेंदिवस अधिकच दूर जात आहे. बहुजन समाज यावर आत्मचिंतन करताना दिसत नाही.

पु. ल. देशपांडे असं म्हणतात की, फुले मानायचे म्हणजे पूर्वजन्म आणि कर्म सिद्धांत ही दरिद्री जनतेने गरिबी विरुद्ध बंड करून उठू नये म्हणून केलेली फसवणूक आहे, हे मान्य करावे लागेल.

देवळातला देव दीनांचा वाली आहे या श्रद्धेने सारे काही आपोआप चांगले होईल ही भावना टाकून द्यावी लागेल. जोतिबांना आपले द्रष्टे पूर्वज मानून त्यांचा वारसा सांगायचा असेल तर जात वर्णवर्चस्व मूर्तीपजा असल्या गोष्टींचा त्याग आचरणाने सिद्ध करावा लागेल.

ज्यांचा उद्धार करायचा त्यांची उदासीनता ही फुल्यांना आपल्या कार्यातला सर्वात मोठा अडसर अन् दुःखही ठरले आहे. महात्मा फुले यांच्या १९७ व्या जयंतीच्या निमित्ताने हे दुःख कायम आहे.

न्यायमूर्ती पी. बी. सावंत खंत व्यक्त करतात की, मानसिक गुलामगिरीचा मंत्र गाडून टाकून स्वतंत्र विचाराला जे पटेल तेच मान्य करा. जोतिबांचा सत्य धर्माचा आदेशच आजची आपली उच्च शिक्षित पिढी पार विसरून गेली आहे.

शेवटी बहुजन समाज हा इतरांनी दिलेल्या ज्ञानांवर गुजराण करणारा घाणीचा बैलच राहिला आहे .जिथे विचारतच क्रांती नाही तिथे समाज क्रांती कशी होणार? जोतिबांच्या समता चळवळीचा रोख समाज स्थित्यंतराकडे होता परंतु त्यांच्या खऱ्या विचारांची ज्योत पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचलीच नाही. ज्योत तिथेच थबकुन राहिली.

आजच्या पिढीने त्यांची ही सत्य धर्माची आणि सामाजिक समतेची ज्योत हाती घेऊन समतेवर आणि शाश्वत मूल्यांवर आधारलेल्या नव समाज निर्मितीसाठी पुढे सरसावणं अत्यंत आवश्यक आहे.

या महात्म्यांच्या विचारांची मशाल आम्ही पुढे नेऊ शकू का ज्यांनी हे विचार रुजवण्याचा तद्यात प्रयत्न केला आम्ही ते समजून तरी घेणार आहोत का? की आपण याबाबत कपाळ करंटे ठरणार आहोत? याचाही विचार करणे गरजेचे आहे. शेवटी बदलत्या काळाच्या ओघात सामाजिक क्रांतीसाठी आजही महात्मा फुलेंचे विचार हे प्रेरणादायी आहे याचा विचार आपल्याला करावाच लागेल.

# संविधानामुळेच देश एकसंघ

दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारतात संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र शासनाने हा दिवस २४/११/२००८ ला एक आदेश काढून राज्यात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने सध्याची राज्यघटना स्वीकारली होती. त्यानंतर २६ जानेवारी १९५९ पासून सध्याची राज्यघटना अंमलात आली. आज देशाच्या राज्यकारभार याच घटनेच्या तरतुदीनुसार सुरू आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करून सदर राज्यघटना तयार केली. घटना लिहिण्यासाठी दोन वर्ष ११ महिने १८ दिवस असा १०८५ दिवसांचा कालावधी लागला.

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहेत भारतीय संविधानाने आपल्याला मूलभूत हक्क दिलेले आहेत त्याचबरोबर नागरिकांसाठी मूलभूत कर्तव्य सुद्धा सांगितलेली आहेत राज्यघटनेचा कलम १४मध्ये समानतेचा अधिकार मिळालेला आहे.

कायद्यापुढे सर्व नागरिक समान असतील हा विचार यातून मांडलेला आहे. श्रीमंतांना वेगळ्या कायदा आणि गरिबांना वेगळा कायदा अशी विभागणी न करता या देशातील प्रत्येक नागरिक कायद्यापुढे समान असणार हा हक्क आपल्याला संविधानामुळेच मिळालेला आहे.

पूर्वी अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळल्या जायची. माणसा माणसांमध्ये भेदभाव केल्या जायचे, चातुवर्ण व्यवस्था आपल्या समाजाचा अविभाज्य भाग होती. यातून माणसा माणसात भेदभावाची दरी वाढत होती. बंधू भावाची, आपलेपणाची भावना हद्दपार झाली होती.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता ही मानव जातीसाठी काळिमा फासणारी बाब आहे.असे स्पष्टपणे सांगितले होते त्यामुळेच भारतातील अस्पृश्यता संपवणे काळाची गरज होती आणि म्हणून राज्यघटना तयार करताना राज्यघटनेच्या कलम १७ मध्ये अस्पृश्यता नष्ट करण्याबाबत प्रावधान करण्यात आले.

आज भारताच्या बहुतांश भागात अस्पृष्यता नष्ट झाली असेल तरी पण काही भागात अधून मधून अस्पृष्यतेच्या घटना घडत असल्याचे दिसून येते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी प्रामुख्याने प्रत्येक नागरिकाला समान अधिकार देण्याच्या राज्यघटनेच्या माध्यमातून प्रयत्न केला.

पूर्वी शिक्षण हे काही समाज घटकाचे महत्त्वाचे केंद्र होते अनेक महान व्यक्तींनी शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजातील अज्ञान व अंधकार शिक्षणामुळे समूट नष्ट होऊ शकतो हा विचार मांडला. यासाठी पुण्यात त्यांनी पहिली शाळा काढली त्यावेळेला समाजातील काही समाज घटकांनी त्यांच्या शिक्षण विषयक धोरणाला कळाळून विरोध केला होता.

अनेक प्रकारचे हाल अपेष्टा सहन करून महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाची बीजे जनमानसात रुजवण्याचा प्रयत्न केला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो हे प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.....

स्वतः डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय सामान्य परिस्थितीतून, गरीबीच्या परिस्थितीतून, आपले शिक्षण पूर्ण केले होते. आणि प्रचंड मोठी ज्ञानसंपदा मिळवली होती. या ज्ञानसंपदेच्या बळावरच ते देशाचे संविधान लिहू शकले.

सामान्य बहुजन समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षण शिकलेच पाहिजे, हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मुख्य विचार होता. त्यामुळेच त्यांनी संविधान लिहीत असताना नागरिकांना राज्यघटनेत शिक्षणाचा अधिकार बहाल केला .राज्यघटनेच्या कलम २१ अ मध्ये सहा ते १४ वर्षाच्या बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यात यावे अशी तरतूद केली.

भारतात जन्मलेल्या प्रत्येक नागरिकाला व्यक्ती स्वतंत्र आहे. त्यासाठी राज्यघटनेच्या कलम १९ मध्ये स्वातंत्र्याच्या अधिकार बहाल करण्यात आला आहे. प्रत्येक व्यक्तीला भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले आहे.

भारताच्या कोणत्याही राज्यात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य आपल्याला राज्यघटनेच्या माध्यमातून दिलेले आहे. कोणत्याही व्यक्तीवर अन्याय झाल्यास त्याला न्यायालयाच्या दाद मागण्याच्या अधिकार आपल्याला मिळालेला आहे. नागरिकाच्या मूलभूत अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न झाल्यास न्यायालयाच्या माध्यमातून आपले स्वातंत्र्य अबादतीत ठेवू शकतो, याची शाश्वती राज्यघटनेच्या कलम २२ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

देशातील नागरिकांचे स्वातंत्र्य अबाधीत राखण्याचे कार्य राज्यघटनेच्या माध्यमातून झालेले आहे. भारत हा बहुभाषीय बहुधर्मीय देश आहे विविधतत एकता हा या देशाच्या प्राण आहे. सर्वधर्माच्या लोकांना एकत्र घेऊन जाणारा संविधान हा या देशाच्या आत्मा आहे.

भारताने लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली आहे. सन १९५१ पासून या देशात निवडणूक प्रक्रिया राबविल्या गेली. तेव्हापासून अनेक सरकारे आलीत आणि गेलीत एवढ्या मोठ्या देशात लोकशाहीची बीजे रोवणार का? हा प्रश्न होता.

जगाच्या बहुतांशी देशात लोकशाहीची पायमुळे खोलवर रुजली नाहीत. भारत प्रचंड मोठ्या देश असून या देशात विविध जातीचे धमार्चे, पंथाचे लोक असूनही या देशात गेल्या ७० वर्षात लोकशाहीची बीजे खोलवर रुजलेली आपल्याला पाहायला मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका व्यक्तीला एक मत हा अधिकार दिला.

या अधिकाराच्या माध्यमातून सरकारे निवडल्या गेली. दर पाच वर्षांनी सरकारच्या कारभाराच्या हिशोब करण्याचे महत्त्वपूर्ण अधिकार जनतेला प्राप्त झाला. येणारी सरकारे जनतेच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यास असक्षम असतील तर त्याला बदलवून टाकण्याच्या नागरिकांच्या अधिकारामुळे गेल्या ७० वर्षात देश एकसंघपणे पुढे जात असल्याचे आपणास दिसून आले.

सध्याची परिस्थिती पाहता आज जाती-धर्माच्या नावावर राजकारण केले जात आहे. समाजा समाजामध्ये तेढ निर्माण होईल,अशा पद्धतीने वाटचाल सुरू असल्याचे दिसून येत आहे समाजातील काही लोकांचे जीवनमान अजूनही उंचावलेले नाही,त्यांच्या विकासासाठी शासन स्तरावरून निकराचे प्रयत्न होणे आवश्यक आहे.

आपल्या राज्यघटनेने भाग ०४ कलम ३७ मध्ये राज्य धोरणाची निर्देशक तत्वे सांगितलेली आहेत. राज्यांनी निती निर्देशक तत्त्वाच्या अधीन राहून राज्यकारभार करावा अशी माफक अपेक्षा आहे. आज सामाजिक समस्या जटील होत जात असताना देशातील मोठ्या वगार्चे जीवनमान आफ्रिकन देशापेक्षा वाईट आहे. त्यांना अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य, आवास, या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. संविधान दिनी राज्यकर्त्याकडून सामान्य नागरिकाच्या अपेक्षा पूर्ण करण्याकरिता प्रयत्न होतील अशी अपेक्षा व्यक्त करू या.

# भारतीय संविधान दिन चिरायु होवो!!

संविधान दिन किंवा राष्ट्रीय विधी दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा करण्यात आला. दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी मानवतेचे पुजारी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला. त्यामुळेच हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

-------------------

भारताचे संविधान अर्थात भारतीय राज्यघटना म्हणजेच भारताचा सर्वोत्तम व पायाभूत कायदा आहे. भारतीय संविधानावर विविध पाश्चात्त्य संविधानांचा प्रभाव आहे. दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेचा स्वीकार केला गेला.

दि. २६ जानेवारी १९५० पासून भारताची राज्यघटना अंमलात आली. राज्यघटना इंग्रजी भाषेत असून तिची हिंदी भाषेतील प्रतही कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या संविधानाचे शिल्पकार आहेत. देशाच्या कारभारासंबंधीच्या तरतुदी एकत्रित व सुसूत्रपणे संविधानात नमूद केलेल्या आहेत. संविधान हे देशाच्या राज्यकारभारात संबंधीच्या तरतुदींचा लिखित असा दस्तावेज आहे.


जनतेतून निवडून आलेल्या प्रतिनिधींमधून शासन किंवा सरकार स्थापन केले जाते. त्यातील तरतुदीनुसारच राज्यकारभार करण्याचे शासनावर बंधन आहे. त्यातील तरतुदी किंवा त्यात नमूद केलेल्या कायद्यानुसार शासन चालवले जाते. संविधानाला विसंगत ठरतील असे कायदे शासनाला करता येत नाहीत. तसे केल्यास न्याय मंडळ हे कायदे रद्द करू शकते.

भारतीय संविधान ग्रंथ आणि समतेचे सत्याग्रही घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन साजरा केला जातो. बाबासाहेबांची १२५वी जयंती वर्ष साजरी केली जात असताना भारत सरकारने त्यांना एक प्रकारची श्रद्धांजली वाहण्यास दि. २६ नोव्हेंबर २०१५ रोजी पहिला अधिकृत संविधान दिन साजरा केला.

संविधानाबाबत जनजगृती व त्यांच्या विचारांचा प्रसार करणे या उद्देशाने देशभरात हा दिवस 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने तर दि. २४ नोव्हेंबर २००८लाच आदेश काढून हा दिवस संविधानदिन म्हणून साजरा करण्याचे घोषित केले होते.

भारतीय इतिहासात हा दिवस संविधान दिन म्हणून जरी साजरा केला जात आहे. तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५०पासून करण्यात आली आहे. भारतीय लोकशाही ही येत्या २६ जानेवारी २०२२ रोजी ७२ वर्ष पूर्ण करत आहे. मात्र भारत सरकारसह भारतीय जनतेला या पावन दिवसाचा विसर पडत चालला असल्याचे निदर्शनात येत आहे.

मुंबईवर याच दिवशी अर्थात २६/११ला दहशतवादी हल्ला झाल्यापासून हा दिवस 'काळा दिन' म्हणून पाळला जाऊ लागला आहे. महत्वाचा संविधान उपेक्षित राहू






लागला.

दि. २९ ऑगस्ट १९४७ रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापन झाली. मसुदा समिती ही सर्वात महत्त्वाची समिती होती. तिचे काम संविधान निर्मिती करणे हे होते. अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेद्वारे स्वीकारला गेला. त्यामुळे भारतात २६ नोव्हेंबर हा दिवस 'भारतीय संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो.

नागरिकत्व, निवडणुका व अंतरिम संसदेविषयीचे आणि इतर काही तात्पुरत्या



कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
9423714883
nikodekrishnakumar@gmail.com

बाबी तत्काळ लागू झाल्या. संविधान संपूर्ण रूपाने दि. २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस 'भारतीय प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा केला जातो.

सन १९५० साली अंमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे सन १९३५च्या भारत सरकार कायद्यावर आधारित आहे. त्या कायद्यान्वये भारताच्या अंतर्गत स्वशासनाचा पाया घातला गेला होता. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांच्या शिष्टमंडळाने मसुदा समितीस सहमती दर्शविली होती.

स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यासाठी त्या मसुदा समितीच्या स्थापनेविषयी भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांची कल्पना होती. १९४६च्या उन्हाळ्यात या समितीची स्थापना झाली. तिची पहिली बैठक त्याच साली ९ डिसेंबर रोजी सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली तर फ्रँक अँथनी यांच्या उपाध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथील संविधान सभागृहात झाली.

११ डिसेंबर रोजी सर्व सदस्यांच्या सहमतीने डॉ. राजेंद्रप्रसाद यांची अध्यक्षस्थानी तर आशुतोष मुखर्जी यांची उपाध्यक्षस्थानी निवड करण्यात आली. हे सभागृह आज सेंट्रल हॉल या नावाने परिचित आहे. पहिल्या बैठकीला ९ महिलांसह एकूण २११ सदस्य उपस्थित होते. दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर अल्पकाळ या समितीने भारताचे प्रतिनिधी या रूपात काम केले होते.

जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या भारताने भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीने खऱ्या अर्थाने लोकशाहीची प्रस्थापना केली. जगात सर्वश्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या भारतीय संविधानासंदर्भात जनजागृती, प्रचार, प्रसार व माहिती व्हावी यासाठी संविधान दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते, मात्र ते सार्वत्रिक पातळीवर होत नव्हते.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची महाविद्यालये आदी आजही अनभिज्ञ दिसत आहेत.

शासनाने भारतीय संविधानची माहिती जनतेला करून देण्यासाठी दरवर्षी या दिवशी पोस्टर प्रदर्शन, बॅनर्स, निंबध स्पर्धा घेण्याच्या सूचना दिल्या जात. मात्र त्या पाळल्या जात नसल्याचे चित्र समोर आले. गतवर्षी २६/११ला मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला होता. तोही दिवस होता २६ नोव्हेंबरच.

मात्र तेव्हापासून शासन दरबारी या दिवसाची 'काळा दिन' म्हणून नोंद करण्यात आली. त्यामुळे तो अभद्र दिवस म्हणून भारतीय जनतेमध्ये कायमचाच रूजला जात असून शासनालाही आता संविधान दिनाचा पुरता विसर पडला आहे. देशावर येणाऱ्या संकटप्रसंगी सारे भारतीय सर्व भेदाभेद विसरून एकत्र येतात. ही ताकद आपल्या भारतीय संविधानाचीच आहे. त्यामुळेच देशाचे ऐक्य व एकात्मता कायम टिकून आहे.

या दिनाप्रमाणेच १५ ऑगस्ट व २६ जानेवारी हेही दिवस सरकारच्या कालदर्शिकेतून नाहिसे होतील की काय? अशीही भिती आता वाटू लागली आहे. म्हणून सर्व भारतीयांचे प्राण- संविधान वाचले पाहिजे, यासाठी संविधान दिनास जास्त महत्त्व देऊ या.

कारण भारतीय संविधान माणसाला माणुसकी शिकविणारा महाग्रंथ आहे. तो भारतासह जगातील सर्व धार्मिक ग्रंथांचा गुरु- महागुरु आहे. असा हा महा ग्रंथराज सर्वांनी खाली खोक्या डोक्यात व हृदयात उतरविण्यासाठी आवर्जून वाचले पाहिजे. त्यानंतरच बोलले, चालले, भोगले, वागले आणि नाचलेही पाहिजे.

# सीसीटीव्हीने फोडले एनडीपीएसचे बिंग

## आरोपी केलेल्या उच्चशिक्षीत तरूणाचे भंडारा येथून अपहरण पोलिसांनीच मोपेडमध्ये ड्रगचे पॅकेट ठेवल्याचा आरोप

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :**
अंमली पदार्थ विरोधी पथकाने गणेशपेठ ठाण्यात ३० मे रोजी नोंदवलेल्या तक्रारीत अर्पण गोस्वामी या तरूणाजवळ ४२.५२ ग्रॅम एमडी ड्रग मिळून आल्याचे म्हटले आहे. त्याच्याजवळून ड्रग,वजनकाटा आणि मोपेड मिळून ३ लाख ६०० रूपयांचा माल जप्त केल्याचे आणि नागपूर येथील गणेशपेठ बसस्थानक नजिक राहुल कॉम्प्लेक्स जवळून ताब्यात घेतल्याचेही त्यात नमूद आहे.

हा संपूर्ण घटनाक्रम दुपारी १२.१५ ते दुपारी २.१५ या वेळेतील दर्शवण्यात आला. परंतु, नागपूर ते भंडारा या मार्गावर याच दिवशी म्हणजे ३० मे रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या संपूर्ण हालचाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्या आहेत. सीसीटीव्ही फुटेजनेच या पथकाची ही बोगसगिरी उघड केली असून, तरूणांना कसे फसवले जाते? याचाही भंडाफोड केला आहे.

**भाग २**

अंमली पदार्थ विरोधी कारवाईसाठी पथकाने एमएच ३१/ एफएक्स ५२८७ क्रमांकाचे महिंद्र बोलेरो आणि एमएच ४०/सीए ६७८८ क्रमांकाची मारूती ब्रिझा कार वापरल्याचे एफआयआरमध्ये नमूद केले. कारवाई जर नागपूर येथे झाली तर त्याच दिवशी ही मारूती ब्रिझा माथनी टोल नाका आणि भंडारा शहरात सीसीटीव्हीत कशी कैद झाली.

यासंदर्भात कथित आरोपी अर्पण गोस्वामी आणि त्याच्या कुटुंबियांच्या तक्रारीनुसार, ३० मे रोजी सकाळी १० च्या सुमारास जेसीबी मशिन शोधण्यासाठी भंडारानजिकच्या फुलमोगरा गावालगत सॅन्डी हॉटिलजवळ उभा असताना, अंमली पदार्थ विरोधी पथकाने त्याला घेरले आणि बळजबरीने एमएच ४०/सीए ६७८८ क्रमांकाच्या ब्रिझा कारमध्ये कोंबले. त्याचा मोबाईल आणि जवळचे पैसे काढून घेतले.

अर्पणची सुझुकी ॲक्सेस मोपेड पथकातील पोलिसांनी ताब्यात घेतली. नंतर, ब्रिझा कारमध्ये अर्पणला घेवून या पथकाने भंडारा शहरातील राजीव गांधी चौक, मुस्लिम लायब्ररी चौक व अन्य भागात फिरवले. तेथून हे पथक अर्पणला घेवून राष्ट्रीय महामार्गाने नागपूर येथे आले. अर्पणची मोपेडवर दोन शिपाई नागपूरला आले.

येथे गणेशपेठ बसस्थानकानजिक राहुल कॉम्प्लेक्सनजिक एका झाडाआड मोपेड उभी करण्यात आली आणि या शिपायांनी डिक्की उघडून त्यात ड्रग पॅकेट टाकले. या सर्व घटना ठिकठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेरात टिपल्या गेल्या आहेत.

पथकाने वापरलेली मारूती ब्रिझा कार (एमएच ४०/सीए ६७८८) ३० मे रोजी भंडाराकडे जाताना सकाळी ९.२२ वाजता माथनी टोल नाक्याच्या सीसीटीव्हीत कैद झाली. पथकातील पोकाँ गणेश जोगेकर आणि मनोज नेवारे यांनी या टोल नाक्यावर त्यांचे ओळखपत्र दाखवले.

या पथकाचे पोलीस निरीक्षक गुल्हाणे हे याच कारने सकाळी ९.४४ वाजता सॅन्डी हॅाटिलनजिकच्या घटनास्थळी पोहचल्याचे फुटेजमध्ये दिसून येते. ९.४७.२५ वाजता या पथकाने अर्पण गोस्वामीला बळजबरीने ताब्यात घेवून ब्रिझा कारमध्ये बसवले तसेच त्याच्याकडून मोपेड ताब्यात घेतली.

अर्पणची मोपेड घेवून जाणारे दोन शिपाई तसेच ब्रिझा कारमध्ये अर्पणला घेवून भंडारा येथील डॉ. अंबादे नर्सिंग होमजवळून जात असल्याचे सकाळी १०.१४.१६ वाजता नजिकच्या सीसीटीव्ही कॅमेरात टिपले गेले. हीच ब्रिझा कार आणि अर्पणची मोपेड घेवून जाणारे शिपाई सकाळी १०.१६.११ वाजता भंडारा शहराबाहेर जात असल्याचे दिसते.

या तरूणाला घेवून पथक नागपूरकडे निघाले. पथकाचे पीआय गुल्हाणे माथनी टोल नाक्यावर त्यांचे ओळखपत्र दाखवत असताना सकाळी ११.०५.४१ वाजता तेथील सीसीटीव्हीत टिपले गेले. पथकातील पोलीस रोहित काळे आणि अन्य एक शिपाई अर्पणची मोपेड घेवून नागपूरकडे तोंड लपवून तसेच नंबर प्लेटवर माती लावून जात असल्याचे याच माथनी टोल नाक्यावरील लेन क्रमांक १० च्या सीसीटीव्ही कॅमेरात कैद झालेत.

अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या या षडयंत्राची पुढील कहाणी रोचक आहे.

(क्रमशः)

## शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीला स्थगिती



**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :**
देवेंद्र फडणवीस यांचे सरकार हे आधीपासूनच शेतकऱ्यांच्या बाजूने उभे आहे. यापूर्वीही आम्ही सांगितले होते की शेतकऱ्यांच्या गळ्याशी येत असेल तर सरकार काही निर्णय घेईल म्हणून आम्ही शेतकरी कर्ज वसुलीला स्थगिती दिली आहे. ज्यामुळे कोणीही शेतकऱ्यांच्या घरी जात तगादा लावणार नाही, असे भाजपचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, कुणी जर चुकीचे असेल तर निवडणूक आयोग आणि पोलिस कारवाई करतील. पण ज्यांच्या घरात पैसे आहेत ते त्यांनी कुठून आणले आहेत, कोणत्या व्यवहारातून आणले आहेत. हे सर्व पोलिस तपासतील.

यामुळे भाजप कार्यकर्त्याच्या घरात पैसे सापडले हे ठीक आहे पण कुणाच्या घरात, बेडरूममध्ये जात हे स्टिंग ऑपरेशन करण्याचा अधिकार आहे का? हे बघावे लागेल, असे मालवण-मध्ये भाजप कार्यकर्त्याच्या घरात सापडलेल्या पैशाच्या बॅग प्रकरणी बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, नीलेश राणे यांनी असे का करावे हे मला माहिती नाही. पण कुणाच्या बेडरूमपर्यंत जात अशी व्हिडिओ शुट करणे हे मला नियमाच्या बाहेर वाटते आहे. पण नीलेश राणेंनी पोलिसांच्या आणि निवडणूक आयोगाच्या ही गोष्ट लक्षात आणून दिली आहे तर याची ते योग्य दखल घेतील, या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे.

**पवारांनी निधीबद्दल बोलणं योग्य नाही**

बावनकुळे म्हणाले की, सरकारच्या योजनांची मांडणी आम्ही करत असतो. निधी द्यायचे अधिकार सरकारकडे आहे. तिन्ही पक्ष निधी द्यायचा निर्णय घेतात.सर्वांना निधी देण्याचा अधिकार आहे तो निर्णय अंतिम करण्याचे काम मुख्यमंत्री करत असतात.

शरद पवारांनी अनेक वर्षे सरकार चालवले आहे, अनेक वर्ष त्यांनी निधी वाटप केले आहे. त्यांनी अनेक निवडणुका या निधीची घोषणा करत जिंकल्या आहेत. त्यामुळे शरद पवार यांनी आता इतक्या उशिरा आम्हाला हे सांगणे योग्य नाही.

बावनकुळे म्हणाले की, सोलापुरातील एका तालुक्यात शिंदेंची शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची युती झाली त्यामुळे शशिकांत शिंदे यांनी हुरळून जाऊ नये. अनेक ठिकाणी अशा वेगवेगळ्या युती झाल्या आहेत.

स्थानिक राजकारणामध्ये मित्र पक्षांची पटले नाही तर कुणी शरद पवारांना सोबत घेतले तर कुठे धनुष्यबाण आणि काँग्रेस सोबत आहे. कार्यकर्त्यांची निवडणूक ८ ते १ वर्षांनी होत असल्याने प्रत्येक जण निवडणूक लढवत आहे.परिवहन आणि महसूल विभाग एकत्र आला आहे. यापूर्वी पोलिस विभाग आमच्यासोबत होताच. आता अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना लगाम घालणार आहोत, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

## अस्वलाच्या हल्ल्यातील जखमीला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**
नवेगाव-नागझिरा वाघ्रप्रकल्पातील अस्वलाच्या हल्ल्यातील अत्यवस्थ रुग्णावर आतापर्यंत तीन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्याचे प्राण वाचावे म्हणून मेडिकलच्या डॉक्टरांकडून शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. रुग्णाच्या उपचारावर अधिष्ठाता डॉ. राज गजभिये व वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे स्वतः लक्ष ठेवून आहेत.



नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्पातील सहवनक्षेत्र नागझिरा संकुलातील नियतक्षेत्र कपाळदेवमधील कक्ष क्र. ९४ मध्ये वनरक्षक एस.जी. तंतरपाळे हे वनमजूर माणिकराम चौधरी, गुणेश शहारे यांच्यासोबत नागझिरा वनक्षेत्रात जाळरेषेच्या कामावर होते. यावेळी अस्वलाने त्यांच्यावर हल्ला केला. यात माणिकराम चौधरी व गुणेश शहारे हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर साकोली येथे प्राथमिक उपचार केल्यानंतर नागपुरातील शासकीय वैद्यकीय रुग्णालय, नागपूर येथे २२ नोव्हेंबरला दाखल केले. त्यापैकी माणिकराम चौधरी यांचीही प्रकृती नाजूक आहे. त्याला जीवनरक्षण प्रणालीवर ठेवण्यात आले.

अस्वलाच्या हल्ल्यात माणिकरामच्या उजवा गाल, नाक, डोळ्यापर्यंत चेहऱ्यावरच्या एका बाजूचे मांस निघाले होते. दुसऱ्या दिवशी माणिकरामच्या हातावरील रक्तवाहिन्या जागेपासून वेगळ्या झाल्या होत्या. गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे त्या मूळ जागेवर आणण्यात आल्या. तिसरी शस्त्रक्रिया एका हातावर करण्यात आली. आता रुग्ण उपचाराला चांगला प्रतिसाद देत आहे.

पुढच्या काळात त्याच्या चेहऱ्यावर मेक्सिकोफेशियल शल्यक्रिया, प्लास्टिक सर्जरी आणि इतर एक अशा एकूण आणखी तीन शस्त्रक्रिया करण्याची डॉक्टरांची तयारी आहे. मेडिकलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे हे नित्याने रुग्णाची भेट घेऊन त्याला एकाही औषधांसह साहित्याची कमी राहू नये म्हणून विशेष काळजी घेत आहे. या रूग्णाचा जीव वाचविण्यासाठी संपूर्ण टीम शर्थीचे प्रयत्न करीत असल्याचे दिसते.

## पाचपट परतफेडीचे आमिष!

### महिला उद्योजिकेसह इतरांना कोट्यवधींचा गंडा

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :**
गुंतवणुकीवर पाचपट परतफेडीचे आमिष दाखवून महिला उद्योजकासह इतरांना २ कोटी २६ लाख रुपयांचा गंडा घालण्यात आला. प्रकरणात सीताबर्डी पोलीस ठाण्यात दुबईमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकासह तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

राजेंद्र सूर्यभान उपाध्याय (४७) रा.अहिल्यानगर, योगेश धर्मा भालेराव (४२) रा. आडगाव, नाशिक आणि संजय माधवराव गाडे (४०) रा. पंचवटी, नाशिक अशी फसवणूक करणाऱ्यांची नावे आहेत.

यातला उपाध्याय सध्या दुबईमध्ये राहतो. नाशिकमधील काही लोक रामदासपेठ येथील हॉटेल सेंटर पॉइंटमध्ये गुंतवणूक योजनांविषयी माहिती देण्यासाठी आले होते. याची माहिती महिला उद्योजिकेला मिळाली. महिला उद्योजक हॉटेल सेंटर पॉइंट येथे गेली आणि तिथे आरोपींना भेटली. आरोपीने तिला प्लॅटिनम कॉइन आणि अल्टिमा कॉइनमध्ये गुंतवणूक केल्यास पाचपट नफा मिळेल, असे आमिष दाखवले.

त्यांच्या योजनांमध्ये गुंतवणूक करून नफा मिळवणाऱ्यांची नावेही उद्योजिकेला सांगितली. त्यांच्यावर विश्वास ठेवून महिला उद्योजिकेने १ कोटी ४८ लाख रुपये गुंतवले. आरोपींनी तिला नफा म्हणून ५५ लाख रुपये दिले. त्यानंतर महिला व इतर लोकांचा विश्वास वाढला व त्यांनी आणखी पैसे गुंतविले. मात्र, त्यानंतर फसवणूक करणाऱ्यांनी कुठलाही नफा किंवा परतावा दिला नाही.

अखेर महिलेने आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार केली. प्राथमिक तपासानंतर सीताबर्डी पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी आलिशान हॉटेल्समध्ये सेमिनार आयोजित करून थोड्या प्रमाणात रक्कम परत करत विश्वास जिंकतात. त्यानंतर गुंतवणूकदारांची मोठी रक्कम घेऊन गायब होतात.

अशा प्रकारच्या अनेक घटना यापूर्वी नागपूर शहर आणि विदर्भात तसेच राज्याचया इतर भागातही घडल्या आहेत. त्यात सामान्य नागरिकांची कोट्यवधीने फसवणूक झाली आहे. त्याउपरही अशा आमिषाला व्यापारी आणि नागरिक बळी पडत असल्यचे दिसून येते.

## महापालिकांच्या मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम जाहीर

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २७ :**
राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्व राजकीय पक्षांचे आणि जनतेचे लक्ष लागले असतानाच, राज्य निवडणूक आयोगाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमात बदल करण्यात आला असून, सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यानुसार आता प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी ३ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून मतदार यादीचा नवीन कार्यक्रम कळवला आहे. यापूर्वी २७ नोव्हेंबर ही हरकती घेण्याची अंतिम तारीख होती, ती आता वाढवण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार कार्यक्रम खालीलप्रमाणे असेलः

**हरकती व सूचना :** प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत आता ३ डिसेंबर पर्यंत असेल.

**अंतिम मतदार यादी :** हरकतींवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या प्रमाणित करून प्रसिद्ध करण्याची तारीख आता १० डिसेंबर निश्चित करण्यात आली आहे.

**मतदान केंद्रे :** मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी १५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.

**केंद्रनिहाय यादी :** मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्याची तारीख २२ डिसेंबर असेल. (पूर्वीची तारीख १२ डिसेंबर होती.)

## 'दृश्य-अदृश्य' मराठी चित्रपटाची 'इफ्फी'मध्ये जादू

**लोकरंजन**

५६व्या आंतरराष्ट्रीय भारतीय चित्रपट महोत्सव म्हणजेच 'इफ्फी' सध्या गोव्यात मोठ्या दिमाखात सुरू आहे. भारतीय सिनेसृष्टीतील दिग्गज कलाकार-तंत्रज्ञांच्या उपस्थितीमुळे 'इफ्फी'ने सर्वांचे लक्ष वेधले आहे.

यामध्ये 'दृश्य-अदृश्य' या आगळ्यावेगळ्या विषयावर आधारलेल्या मराठी चित्रपटाने प्रेक्षकांवर जणू जादू केली आहे. नुकतेच 'इफ्फी'मध्ये झालेल्या 'दृश्य-अदृश्य' चित्रपटाच्या शोला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कौतुक केले. आरएसटी कॅनव्हास निर्मित आणि मिलिंद लेले दिग्दर्शित दृश्य-अदृश्य या सस्पेन्स थ्रिलर चित्रपटाची निवड प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी झाल्यापासून सगळीकडे या चित्रपटाची चर्चा रंगू लागली आहे.



मिलिंद लेले यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. 'इफ्फी'मध्ये 'दृश्य-अदृश्य'ची निवड होण्याचा क्षण मराठी सिनेसृष्टी, कलाकार आणि तंत्रज्ञांसाठी अभिमानाचा ठरला आहे.

मराठीपासून हिंदीपर्यंत अभिनयाचा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री पूजा सावंतने या चित्रपटात मुख्य भूमिका साकारली आहे.

पूजाने साकारलेल्या व्यक्तिरेखेचे इफ्फीमध्ये खूप कौतुक झाले. दृश्य-अदृश्यह्न हा मानवी मनाच्या गूढ गाभ्यापर्यंत नेणारा एक रहस्य आणि भावनांच्या संगमातून जन्मलेला चित्रपट आहे. आपल्या डोळ्यांना दिसणारे आणि सत्य यांच्या संभ्रमात गुरफटवून ठेवणारी पटकथा क्षणाक्षणाला उत्कंठा वाढविणारी आहे. वास्तव आणि भ्रम याच्यातील सीमारेषा धूसर होत गेल्या की सत्याचे दृश्य किती अदृश्य होते, हे या चित्रपटात प्रभावीपणे दाखवण्यात आले आहे.

■ ■ ■



## अभिजीत सावंत आणि गौतमी पाटील यांच्या एआय व्हिडीओने वेधलं प्रेक्षकांचं लक्ष

निळाशार समुद्र, नारळाच्या बागा आणि अभिजीत गौतमीचा एआय लूक मधला व्हिडिओ सध्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेताना दिसतोय. काही दिवसांपूर्वी गौतमीने अभिजीत सावंत सोबतचा एक सेल्फी सोशल मीडिया वर शेयर केला होता आणि कमिंग सून असं साजेस कॅप्शन देखील या फोटोला दिलं होत तेव्हा प्रेक्षकांनी हे दोघं सोबत नवीन प्रोजेक्ट करणार असल्याचा अंदाज लावला होता आणि या व्हिडिओने त्यावर शिक्कमोर्तब केला आहे. कायम एव्हरग्रीन गायक असलेला अभिजीत पुन्हा एकदा चर्चेत आला आणि त्याने नुकतंच आतच्या तरुणाईसाठी मोहब्बत लुटाऊंगा या त्याचा सदाबहार गाण्याचं नवं कोर व्हर्जन देखील गायलं.

अभिजीतने आजवर त्याचा आवाजाने आणि बिग बॉस मधल्या कमाल खेळीने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केलं आहे येणाऱ्या काळात देखील तो अनेक वैविध्यपूर्ण आणि कमाल प्रोजेक्ट्सचा भाग होणार आहे. इंडियन आयडॉल ते आजच्या पिढीला साजेशी ट्रेंडिंग गाणी देणारा तरुणाईचा लाडका गायक ठरतोय. गौतमी सोबत आता अभिजीत कोणतं नवीन गाणं करतोय? हा प्रश्न प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा असला तरी लवकरच याच उत्तर प्रेक्षकांना मिळणार असल्याचं कळतंय.

■ ■ ■

## पारुच्या संघर्षाला नवं वळण किर्लोस्कर घरात तुफान घडामोडी!



झी मराठीवरील पारू या मालिकेने सध्या नवे वळण घेतलेले आहे. किर्लोस्कर कुटुंबात मोठ्या भावनिक घडामोडी घडत असून, अलीकडे संपूर्ण किर्लोस्कर कुटुंब आदित्यच्या कार्यक्रमाला वेषांतर करून, गर्दीत चेहरा लपवत पोहोचले आहे. आदित्यला पाहताना अहिल्याच्या डोळ्यांत अश्रू दाटतात आणि हा क्षण श्रीकांतच्या मनाला लागतो. या घटनेनंतर किर्लोस्कर घरात श्रीकांत आणि अहिल्या यांच्यात जोरदार वाद रंगतो आणि त्या तणावपूर्ण क्षणी श्रीकांतला हृदय विकाराचा झटका येतो. ही बातमी ऐकून आदित्य पारुच्या समोर डोंगर कोसळतो श्रीकांत अहिल्याला शेवटची विनंती करतो आपला मुलगा आणि सून दोघांनाही परत घरी आण... या विनंतीनंतर अहिल्या थेट पारुला भेटते. या प्रसंगातून घरातील अनेक दडलेली गुपितं उघड होऊ लागतात. पारू आता शिक्षण आणि जबाबदाऱ्या सांभाळत स्वतःचं स्थान निर्माण करण्यासाठी अधिक दृढनिश्चयाने उभी राहणार आहे. महिन्याच्या अखेरीस प्रिया आणि पारु एकत्र येऊन दिशाला घराबाहेर काढण्याची योजना आखणार आहेत. या निर्णायक घडामोडींमुळे किर्लोस्कर कुटुंबातील पुढील अध्याय अधिकच रोमांचक होणार हे नक्की. बघायला विसरू नका पारू दररोज संध्या ७ वा. झी मराठीवर.





## नात्याची अनोखी सांगड घालणारं शंकर जयकिशन लवकरच रंगभूमीवर!

मराठी रंगभूमीवर एक विनोदी, हृदयस्पर्शी आणि नातेसंबंधांचा वेध घेणारं नाटक शंकर-जयकिशन लवकरच नाट्यरसिकांच्या भेटीला येत आहे. वडिल- मुलीचे गुंतागुंतीचे नाते, वर्षानुवर्षे दडलेली कटुता आणि अचानक जीवनात घडलेल्या अनपेक्षित व्यक्तीच्या आगमनाने बदलणारे समीकरण अशी या नाटकाची कथा आहे. कथानकात वडिल मुलीच्या नात्यात कोणी तिसरा येतो. त्याच्या येण्यामागंच नेमकं कारण काय? की त्याच्या आयुष्यात काही गूढ रहस्य दडलंय? याचं उत्तर नाट्यरसिकांना नाटक पाहूनच मिळणार आहे. हे मजेदार, हटके आणि भावनिक नाटक विशेष ठरणार आहे, कारण पहिल्यांदाच भरत जाधव आणि महेश मांजरेकर हे दोन प्रभावी कलाकार रंगभूमीवर एकत्र दिसणार आहेत. त्यातही महेश मांजरेकर तब्बल २९ वर्षांनंतर रंगभूमीवर पुनरागमन करत आहेत. त्यामुळे महेश मांजरेकर यांच्यासाठीही आणि प्रेक्षकांसाठीही हा एक खास क्षण असणार आहे.

भरत जाधव एण्टरटेन्मेंट निर्मित सुरज पारसनीस दिग्दर्शित या नाटकाचे लेखन विराजस कुलकर्णी याने केले आहे. क्षितिज पटवर्धन यांचे गीत लाभलेल्या या नाटकात शिवानी रांगोळे, भरत जाधव आणि महेश मांजरेकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. विनोद, भावना आणि नात्यांचे सुंदर मिश्रण असलेल्या शंकर-जयकिशन या नाटकाचा शुभारंभ १९ डिसेंबर रोजी विलेपार्ले येथील दिनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे होणार आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

**रणांगण नगरपालिकेचे**

## लोकनायक नव्हे... आयुष्यभर लोकसेवक बनण्याचा संकल्प
## ॲड. विशाल भोयर यांची विशेष मुलाखत



पक्ष : भाजप
प्रभाग क्र. ४, चांदूर रेल्वे

**■ बाळासाहेब सोरगिवकर चांदूर रेल्वे, दि. २७ :**
समाजसेवा कोणत्याही व्यवसायातून करता येते, मात्र तिची एक मर्यादित चौकट असते. वकीली करताना ती जाणवली. त्यामुळेच राजकारणाच्या माध्यमातून थेट लोकांमध्ये जाऊन लोकनायक नव्हे तर आयुष्यभर लोकसेवक म्हणून काम करण्याचा निर्धार केला, असे प्रभाग क्र. ४ मधून नगरसेवकपदासाठी उभे असलेले भाजप उमेदवार ॲड. विशाल प्रमोदराव भोयर यांनी महासागरला दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले.

**■ विकासाची तुमची व्याख्या काय?**
जनतेच्या समस्या सोडविणे हेच खरे विकासाचे मापदंड. मी या शहरात वाढलो, इथेच शिकलो, संघर्ष केला. प्रभागातील प्रत्येक गल्ली, प्रत्येक अडचण मला माहीत आहे. तुंबलेली गटारे, रस्त्यांची अवस्था, पाणीपुरवठा, शिक्षण, युवकांना रोजगार आणि महिलांची सुरक्षितता या सर्व प्रश्नांना प्राधान्य देऊन मार्गी लावणे हेच माझे ध्येय.

**■ नगरपालिकेच्या प्रशासनात कोणते बदल आवश्यक?**
गरीब आणि सर्वसामान्यांना तातडीचा न्याय देणारे प्रशासन गरजेचे आहे. सातव्या वर्षी वडिलांचे छत्र हरवले. घर अतिशय कठीण परिस्थितीत होते. त्यावेळी माझी आई योद्धयाप्रमाणे उभी राहिली. तिच्या कष्टांनी मी उभा राहिलो. गरीबीची झळ काय असते, हे मी जवळून पाहिले आहे. त्यामुळे प्रशासनाने गरीबांच्या अडचणी त्वरित सोडवणारे असावे, ही माझी ठाम भूमिका असल्याचे ते म्हणाले.

**■ शिक्षणाबद्दल तुमची भूमिका काय?**
शिक्षण उत्तम दर्जाचे, परवडणारे आणि शक्य असल्यास विनामूल्य असावे. आज शिक्षण महाग झाले आहे. नगरपालिकेच्या शाळा उत्तम प्रतीचे शिक्षण देऊ लागल्या, तर तिथे प्रवेश घेण्यासाठी पालकांची रांग लागेल.

**■ राजकारणात प्रवेश करण्याचा निर्णय का?**
राजकारण हे तरुणांसाठी बदलाचे व्यासपीठ आहे. वकिली करताना अनेक कुटुंबांचे संघर्ष पाहिले. तेव्हा वाटले, फक्त न्यायालयात लढून चालणार नाही, तर समाजासाठी प्रत्यक्षात काम करणे आवश्यक आहे. भाजपने माझ्या विचारांना साथ दिली आणि मला सर्वात तरुण उमेदवार म्हणून संधी दिली. ही संधी सन्मान नसून जबाबदारी आहे. जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करेन, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## जनसामान्यांच्या समस्या पैसेवाल्यांना कळत नाहीत?
### उमेदवार दुर्गा भूत यांची विशेष मुलाखत



पक्ष : भाजप
प्रभाग क्र. ४, चांदूर रेल्वे

**■ चांदूर रेल्वे, दि. २७ :**
निवडणूक आली की धनाढ्य राजकारणी जोर करतात, साम-दाम-दंड-भेद वापरून जिंकतात. अशा पैशांच्या राजकारणातून निवडून आलेल्यांना जनसामान्यांच्या समस्यांची काय जाणीव राहणार? त्या पाच वर्षांनी तशाच राहतात, असे मत प्रभाग क्रमांक ४ च्या भाजप उमेदवार दुर्गा रतनलाल भूत यांनी मुलाखतीत व्यक्त केले.
मी एक सामान्य कार्यकर्ता आहे, आणि माझी उमेदवारी ही जनतेशी असलेली नाळ आणि प्रामाणिकतेतून आली आहे, असे त्या पुढे म्हणाल्या.

**■ जनतेने तुमच्यावर का विश्वास ठेवावा?**
प्रामाणिकपणा-हीच माझी ताकद. माझा संपूर्ण आधार माझा परिवार आणि आमचे स्वतःच्या मेहनतीवर चालणारे एक छोटेसे कपड्यांचे दुकान. अनेक अडचणी आल्या, चढउतार आले, पण हार मानली नाही. ग्राहकांचा विश्वास, चिकाटी आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची वृत्ती यांनी माझा प्रवास घडवला.

**■ व्यापारी महिला म्हणून समाजात काम करताना कोणते अनुभव आले?**
ह्वदररोज लोकांशी थेट संपर्क असल्याने त्यांच्या अडचणी जवळून समजल्या-महिलांचा आत्मसन्मान, युवकांचा रोजगार, वृद्धांची काळजी. दुकान हे आमच्या उत्पन्नाचे साधन असले, तरी ते लोकांशी नातं बांधणारं ठिकाण बनलं.

**■ राजकारणात येण्याचा निर्णय का घेतला?**
प्रभागातील अनेक समस्या वर्षानुवर्षे तशाच आहेत-रस्ते, स्वच्छता, नागरिक सुविधा, सुरक्षित वातावरण. फक्त बोलून काही होत नाही. प्रत्यक्ष व्यवस्थापनात येऊन काम करण्याची इच्छा झाली. भाजपाने दाखवलेला विश्वास ही माझी ताकद आहे. मी जमिनीवरून आलेली, संघर्षातून उभी राहिलेली सामान्य महिला आहे. मेहनत, प्रामाणिकपणा आणि लोकांशी जुळलेले नाते हेच माझे खरे भांडवल आहे.

**■ निवडून आल्यास प्रभाग ४ साठी प्राधान्याची कामे?**
रस्ते, नाले, पिण्याचे पाणी-मूलभूत सुविधांचे उन्नतीकरण. व्यापारी व लघुउद्योजकांसाठी सुलभता, स्वच्छ व सुरक्षित परिसर, रस्ते दिवे, नियमित स्वच्छता, ज्येष्ठ नागरिक सुविधा इत्यादी प्राधान्यक्रमाची कामे आहेत. प्रभाग ४ च्या विकासासाठी मला जनतेचा आशिर्वाद नक्कीच मिळेल, असा माझा दांडगा विश्वास आहे, असल्याचे प्रांजळ मत उमेदवार सौ. दुर्गा भूत यांनी व्यक्त केले.